
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
क्र. नं.



REFBK-0004232

त्र्यं. रा. अभंग


# लक्षप्रत

[illegible]

मराठी ग्रंथ संग्रहालय
8232
★
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद क्र. [illegible]
ठाणे

# पूर्णपणें आपलेच देशांत तयार झालेले

# प्रभाकर कंदील




कंदीलांत जरूर त्या सुधारणा केल्या असून प्रकाश देण्याचे कामीं ते सर्वतोपरी समाधानकारक असें आहेत सर्व प्रातांतील लहान मोठ्या गांवीं

## विक्रीची सोय केली आहे !

ज्या लहान व्यापाऱ्यांना आमच्या सर्व प्रकारच्या कंदीलाच्या पेट्या संग्रही ठेवणें शक्य नसेल अशा-करितां ३ पितळेचें ३ पितळी बुडाचे व ६ टिनचे असें १२ कंदील प्याक करून स्पेशल पेट्या केल्या आहेत. अशा पेटीची घाऊक भावानें कारखाना पोंच किं. १९ रु. आहे. ज्या कोणांस एक डझन, अगर अधिक माल पाहिजे असेल त्यांना तो व्यापारी भावानेंच पुरवुं.

**स्वराज्य संपादनाच्या काळांत स्वदेशी**

## प्रभाकर कंदीलच वापरा !

**मेकर्स—ओगले ग्लास वर्क्स, लिमिटेड**

पो. ओगलेवाडी ( सं औन्ध )

'आज रावसाहेबांच्या इथली—

# मेजवानी !



झुळझुळीत, नीटनेटके मनाजोगे कपडे कांहीं नाहींत घालून जायला ! मोठ्या हौसेनें महागाईचें कापड घ्यावें आणि त्याचे कपडे हे असें करून मिळाले कीं असा संताप येतो—'



व्यवस्थित अंगाबरोबर, नीटनेटका कपडा न मिळाल्यानें पुष्कळांच्या तोंडून असेंच उद्गार निघतात. पण

**आमच्या दुकानचा एकदांच अनुभव घ्या**

नंतर तुह्मी आमचे कायमचे गिऱ्हाईक व्हाल !

प्रोप्रायटरः— **एस्. बी. कारंजकर,**

**डेक्कन टेलरिंग फर्म,** मोतीचौक सातारा

# एकदांचा पास झालों !



हो, घरांत पातळें वगैरे घ्यायचीं झालीं ह्मणजे ती एक परीक्षेचीच वेळ असते. मनाजोगता माल व तोहि योग्य किंमतींत मिळाला तरच बरं. नाहीं तर ओम्............

**फडके यांचीं सर्वांगसुंदर लुगडीं**

**व पातळें निघूं** लागल्यापासून ही अडचण अजिबात दूर झाली आहे. तरी तींच नेहमीं मागवा.

**धी फडके टेक्स्टाइल अँड इंडस्ट्रिअल वर्क्स लि.**

**कऱ्हाड, ( जि. सातारा )**

---

## थंडगार सुवासिक व केशवर्धक

# लेमन्क्रीम अर्थात् लिंबलोणी

डोक्यास चोळा डोकें दुखणें, गाढ झोंप न लागणें, भोंवळ, डोळ्यांची व मस्तकाची आग, केस गळून पडणें किंवा अकालीं पांढरे होणें वगैरे विकारावर रामबाण ह्मणून आज दहा वर्षे प्रसिद्ध आहे. हल्लीं याचा खप बेसुमार वाढला आहे व ह्मणून वाहत्या गंगेंत हात धुवून घेण्याकरितां याची नुकतीच नक्कल सुरु झाली आहे. ६ औं. बा. व्ही. पी नें १॥ रु. ३ बाटल्या ३ रुपये.

**केलव्हिन केमिकल कंपनी**

मुंबई नं. ४

स्थापना १८९२ ॥ ॐ ॥ सर्वांत जुनें

# एकच दुकान

तुह्माला कोणतेंही पुस्तक
अगर सर्व तऱ्हेचीं औषधें व
स्टेशनरी लागल्यास
प्रथम आमचेकडे मागा.

डिंगणकर जनरल स्टोअर्स, बागेजवळ, सातारा सिटी.

---

रा. ब. रा. रा. काळे, ॲड्व्होकेट सातारा.
यांचें
मुंबई इलाख्यांतील

## जमिन-धारा-पद्धति

मराठी प्रत किं. ८० फक्त; इंग्रजी प्रत १ रु. फक्त. टपाल खर्च निराळा.

किर्लोस्कर, दासबोध, ऐक्य इत्यादींचे सुंदर अभिप्राय

रा. त्र्यं. रा. अभंग विरचित

## रंगनाथ स्वामींचें सं. चरित्र.

भाग ला
किं. १॥ आणा, टपाल खर्च ८॥.

—ऐक्य ऑफिस, सातारा.

REFBK-0004232
REFBK-0004232


# साधना औषधालय.

ढाका [ बंगाल ]

शाम बाजार, कलकत्ता.

अध्यक्ष—**जोगेश चंद्र घोस**, एम्. ए. एफ्. सी. एस. [लंडन]
भागलपूर कॉलेजचे केमिस्ट्रीचे माजी प्रोफेसर.

निवळ आयुर्वेदिक शास्त्रीय पद्धतीनें बनविलेली औषधें. अत्यंत शुद्ध असल्याची ग्यारंटी कॅटलॉग फुकट. प्रकृतीला काय होतें. हें कळविलें असतां अत्यंत काळजीपूर्वक मोफत प्रिस्क्रिप्शन पाठवूं

**मकरध्वज** [ सुवर्ण सिंदूर )
सर्व रोगांवर आश्चर्यकारक अचुक गुण देणारें. किं. तोळ्यास ४ रु

**सारिवडी सारसा**
गरमी, विषप्रयोग, परमा व रक्तदोषावर रामबाण, किं. शेरास ३.

**शुक्र संजीवन**
धातुक्षीणता, नपूंसकत्व, स्वप्नावस्था वगैरेवर रामबाण, किं. शेरास १६रु.

**अबला बांधव योग**
पांढरी अगर तांबडी धुपणी, कमर दुखणें, अनियमित ऋतुकाळ वांझपणा वगैरे स्त्रियांच्या सर्व रोगांवर उत्तम गुण देणारे. १२ डोस २ रु ५० डोसिस रु. ५.

॥ ॐनमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय, मु. पो. आंजलैं

**प्रोप्रायटरः—डॉ० रंगनाथ कृष्णशास्त्री विवलकर,**
एल. एच. एम. एस. एम्. बी. ए.

## कोंकण प्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतीचीं जगप्रसिद्ध रामबाण औषधें:—

| | |
|---|---|
| अपूर्वमालिनीवसंत-धातुज्वर, जीर्णज्वर, अश्मरी ... १८ | घोडाचोळी-सर्व रोगांवर वस्ताद ४ |
| अभ्रकभस्म-रक्तविकार, श्वास, खोकला ९ | शूलकुठार-पोटदुखी, अग्निमांद्य व वातनाशक २ |
| अभ्रकभस्म-शतपुटी क्षय-मेह, पांडु, प्रदर ५ | लोहभस्म-पौष्टिक व शूलादिकांवर २ |
| अभ्रकभस्म-सहस्त्रपुटी-क्षय-मुळव्याधी, व्रण ५० | सुवर्णमाक्षिकभस्म-मेह व खर इ. ना. व पौष्टिक २ |
| आनंदभैरव-नं. १-क्लास, अतिसार, व शैत्य २ | हरतालभस्म-ज्वर, व्रण, कुष्ट इ. ना. २ |
| कालकूटरस-ज्वर, व सन्निपात ५ | वंगभस्म-प्रमेह व खरनाशक आणि पौष्टिक २ |
| समीरपन्नग-महाश्वास, ज्वर, दमा इ. ना. ६ | चंद्रप्रभा-रक्तकृच्छ्र-प्रमेह, क्षय प्रदर ना. २ |
| सूतशेखर-आम्लपित्त, शैत्य, वांती व गुल्म ५ | श्वासकुठार-श्वास,कास, उचकी इ. ना. २ |
| रससिंदूर-कफ-श्वास-ज्वर ३ | |

**सूचनाः**— वरील औषधें पूर्ण खात्रीची असल्यामुळें आज ५० वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला ह्मणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीचे खर्च्यासह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक पाठवूं.

आमचीं औषधें मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

**कृष्णशास्त्री विवलकर वैद्य, मु. पो. आंजलैं,**
**ता दापोली, जि. रत्नागिरी.**

# गंधर्वाचें गाणें ह्मणजेच

# रसिकांची मेजवानी !

पण त्यालाही उत्तम प्रकारची पेटीची सांथ असते ह्मणून तें विशेष कर्णमधुर होतें. तुह्मी पेटी वाजवावयास शिका ह्मणजे साथही हळू हळू करतां येईल.

**प्रोप्रायटरः– आर. आर. सातारकर**

**श्रीराम हर्मोनियम क्लास,** चोळखण आळी सातारा.

---

# सुख–स्वप्नें

**[ पांच सामाजिक गोष्टी ]**

लेखकः—**वाग्भट नारायण देशपांडे,** एल् एल्. बी. ॲडव्होकेट

प्रस्तावना–लेखिकाः— **श्री. कमलाबाई देशपांडे,** बी. ए.

" स्त्रियांना शिक्षण मिळून त्या अधिक सुसंस्कृत व नवीन जीवन-क्रमाचें आकलन करण्यास जर अधिक समर्थ होतील तर समाजांत काय फरक होईल, गृहसौख्यांत कोणत्या सुखाची भर पडेल, व एकं-दरींत स्त्री आपल्या पतिपुत्रबंधूंना कशी मदत करणारी व मार्गदर्शिका होईल यांचें स्वप्न रूपानें हें कल्पनाचित्र मांडलें आहे " किं. १। रु.

| | | |
|---|---|---|
| **मिळण्याचीं ठिकाणें** | प्रकाशक गणेश महादेव आणि कंपनी पुणें | मॅनेजर ऐक्य ऑफिस सातारा. |

# ' कां हो कुठें ? –

कलेक्टर साहेबांच्या भेटीला कां ?

तरीच आज अगदीं अप्--टु--डेट ड्रेस केलाय ! '

तुह्मास अप--टु--डेट कपडे

**यवतकर** यांच्या **टेलरिंग शॉप–**

मध्येंच मिळतील.

प्रोप्रायटरः--- **आर. बी. यवतकर,**

चोळखण आळी, सातारा

---

**महाराष्ट्राचे प्रख्यात कादंबरीकार**

**कै. वा. हरी नारायण आपटे**

यांनीं लिहिलेलीं पत्रें —

# - हरिभाऊंचीं पत्रें -

**किं. १॥ रु. ट. ख. निराळा.**

## अभिप्राय

' पत्रें वाचनयि असल्यामुळें हें पुस्तक साहजिकच संग्राह्य झालें आहे. खाजगी पत्रें लिहिणें ही देखील एक कला आहे. या कलेमुळेंच इंग्रजी लेखकांपैकीं पुष्कळांचीं पत्रें छापून निघालीं असून आदर्श ठरलीं आहेत. हरिभाऊंचीं पत्रें उजेडांत आल्यामुळें महाराष्ट्रीयांना त्यांचा वरील दृष्टीनें उपयोग होईल असा भरंवसा आहे. ' **नवा काळ**

" . उत्कर्षेच्छु व कार्यकर्त्या माणसानें आपल्या विषयांशीं कसें तद्रूप झालें पाहिजे, हें पहावयाचें असल्यास, हरिभाऊंचा हा पत्र–समुच्चय उत्तम उपयोगी पडेल. " **किर्लोस्कर मासिक**

**ऐक्य ऑफिस सातारा.**

मेजवानी नैसर्गिक उपचारांची मेजवानी !!

# नैसर्गिक उपचारांचीं पांच पुस्तकें

**१ लंघन-चिकित्सा-शिक्षक**—यांत प्लेग, इन्फ्ल्युयेंझा, डेंग्यू, ताप, कालरा वगैरे रोग औषध न घेतां फक्त लंघन करूनच कसे बरे करावेत याची सचित्र माहिती दिली आहे. नवीन आवृत्ति तिसरी. पृष्ठें २२८ किं. १॥८

**२ आरोग्य-चिकित्सा-शिक्षकः**— जे डॉक्टर वैद्यांचे इलाज करूनहि रोगमुक्त झाले नाहींत अशा रोग्यांना औषधांशिवाय चोळणें, शेकणें, व्यायाम करणें. पृष्ठें २३२. किं.१॥८

**३ वैद्यक ज्योतिष-शिक्षकः**—मनुष्याच्या शरिरावर राशिचें परिणाम कसें होतात, कोणता ग्रह अनिष्ट आला असतां कोणते रोग होतात व त्याचे निवारण कसें करावें याची सशास्त्र माहिती दिली आहे. किं. १॥ रु.

**४ नेत्र-व्यायाम-शिक्षकः**—यांत डोळ्यांतील गळ, सारा, भूर, फुलें, मोती व कांचबिंदू, डोळे दिपणें, हे डोळ्यांचे दोष, चष्मा न लावतां कसें बरें करावेत याची सचित्र माहिती दिली आहे. किं. रु. १

**५ तोतरेपणाचा प्रतिकारः**—वाणीत बोबडेपणा, अडखळणें, शब्दोच्चार स्पष्ट न होणें तोतरें बोलणें इ. वाग्दोष बरें करण्याची सचित्र माहिती किं. रु. १

वरील सर्व सेट **मेजवानीचें** ग्राहकांस व्ही. पी. सह
६॥ रुपयांत देऊं.

**देशी रंगारी शिक्षकः**—वनस्पतीजन्य द्रव्यांपासून निरनिराळें रंग तयार करणें चिटें छापणें, खडी काढणें तसेंच सूत व कापड रंगविण्याची संपूर्ण माहिती किं. १॥ रु.

**आमचेकडे इतरही धार्मीक, शालोपयोगी वगैरे पुस्तकें मिळतील.**

## एम्. वाय्. पाटणकर अॅन्ड सन्स.

**हरकुवर बाईची चाळ, ठाकूरद्वार-मुंबई, नं. २**

**खास शुद्ध स्वदेशी, टिकेकर लुगडी व पातळे**

वगैरे माल खालील किंमतींत देऊं.

प्याकींग, पोस्टेज वगैरे खर्च निराळा पडेल.

रेशमी पदर पाहिजे असल्यास आठ आणे जास्त.

रुपये १०० वरील आर्डरीस व्यापारी सवलत.

| | |
|---|---|
| किनार महेश्वरी, | किं. रु. ८. |
| मिश्री, मिनाक्षी, रुद्राक्षी, | किं. रु. ८ आणे ८, |
| सुती मिनाक्षी. | किं. रु. ७ |

क्याटलाग व सँपल बुके फुकट पाठऊं.

**दि टिकेकर टेक्सटाईल मिल लि.**

टिकेकरवाडी. सोलापूर.

सर्वोत्कृष्ट स्वदेशी साबण वापरणें ह्मणजे कपड्यानां "मेजवानी" च दिल्याप्रमाणें नव्हे काय ?

ह्मणूनच गुणांत श्रेष्ठ व पवित्र

**वॉशेक्स सोप व**

**धोबी बार सोप वापरा**

औंध सोप वर्क्स ओगलेवाडी.

जि. सातारा सं. औंध.

विविध ग्रंथमालेतील स्वतंत्र पुस्तक

## राष्ट्रीय गीतांची

# मेजवानी

ग्रंथ संग्रहालय
क्र. 4232

लेखकः—त्र्यं. रा. अभंग, सातारा.

" स्वतंत्र वनवृत्तिच्या घडिघडी सुखाते स्मरे "

—कृष्णशास्त्री चिपळूणकर

मकर संक्रान्त शके १८५२

५८
१९३०

किंमत १० आणे.

प्रकाशकः—
**गोविंद विनायक राजगुरु.**
सातारा.

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

मुद्रकः—
**कृष्णाजी मोरेश्वर जोशी**
'सिटी' प्रेस, सातारा.

# वाचकांकरितां थोडेसें—

प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासांत कवी व शाहीर यांनीं केलेल्या अमोल कर्तव्याची कितीतरी उदाहरणें आढळतात. भावनांना चेतना उत्पन्न करून त्यांचें स्थित्यंतर कृतींत घडवून आणणारा शाहीर किंवा कवी, खरोखर, निःशस्त्र असूनही आपल्या देशाची फार मोठी कामगिरी करीत असतो. शाहिराचें काव्यशस्त्र शेकडों वीरांच्या तलवारींना रणांगणांत खेंचत असतें. वीरांच्या अंतःकरणांत स्वदेशप्रेमाची ज्योत उत्पन्न करून, त्यांच्या हातून स्वार्थत्यागाचीं व तशींच अलौकिक धैर्यानीं कृत्यें घडवून आणण्यास कारणीभूत होणारा एकटा शाहीर, आपल्या देशाची अत्यंत अमोल सेवा करीत असतो. इतिहासाच्या चित्रपटांवर चमकणाऱ्या प्रसंगांचा शाहीर हा जणुं चित्रकारच असतो. शाहिराचें बोलतें अंतःकरण ऐकणाराच्या हृदयांस पीळ पाडीत असतें, हें त्यांच्या कवनांवरून व त्यांच्या काव्यश्रवणाच्या परिणामावरून प्रतिबिंबित होतें. अंतःकरणांत सारखी तळमळ चालू असल्याशिवाय इतकें परिणामकारक काव्य कधींच निर्माण व्हावयाचें नाहीं; व ह्मणूनच कवी व शाहीर यांचें स्वदेशप्रेम व निष्ठा ही केवळ अवर्णनीयच असतात असें ह्मणावें लागतें.

प्रस्तुत पुस्तकांत माझे स्नेही श्री. **त्र्यं. रा. अभंग** ऊर्फ **सीता-तनय** यांच्या सुंदर व बोधप्रद राष्ट्रीय गीतांचा समुच्चय वाचकांना सादर करण्यात येत आहे. सीतातनय हे अत्यंत भावनाप्रधान कवी असून त्यांच्या कविता व गीतें किती परिणामकारक, बोधप्रद व अंतःकरणास पीळ पाडणारीं झालीं आहेत. हें वाचकांना सहज कळून येईल. श्री. अभंग यांचा व माझा थोड्या दिवसापूर्वी अत्यंत निकटीचा परिचय

झाला असल्यामुळें, मला त्यांच्या हृदयांतील राष्ट्रीय प्रेमाची सतत वाढती ज्योत काय कामागिरी करीत असते, हें नित्य पाहावयास सांपडतें. कवी अभंग यांचें अंतःकरण फारच कोंवळें आहे. त्यांच्या काव्यांत करुणरसासच नेहमीं प्राधान्य मिळतें. त्यांच्या कवितेंतील कांहीं करुणप्रसंग वाचकांच्या डोळ्यांतून अश्रु काढल्याशिवाय रहाणार नाहींत.

गेल्या संक्रांतीपासून तो तहत आजच्या नव्या संक्रांतीपर्यंतच्या अवधींत घडलेल्या हिंदुस्थानांतील राजकीय चळवळींचें शद्बचित्र श्री. अभंग यांनीं आपल्या गीतसंग्रहांत अगदीं उतमप्रकारें काढलें आहे.

राष्ट्रीयगीत ह्मटलें म्हणजे तें वीररसोत्पादक असतें, अशी पुष्कळांची कल्पना असते परंतु श्री. अभंग यांचीं राष्ट्रीय गीतें करुणरसांनीं ओथंबलेलीं असून, तीं वाचकांना मोठ्या मार्मिकतेनें हिंदजनतेच्या हल्लींच्या करुणास्पद परिस्थितीची योग्य जाणीव करून देतात व अशा रीतीनें अगदीं अंतःकरणांत शिरून कर्तव्यजागृती करण्याचें झटपट काम करितात. त्यांनीं वर्णन केलेले प्रसंग अगदीं साधे व सतत आढळणारे असेच आहेत, व त्यांवरून त्यांनीं उत्तम बोध काढिला आहे. श्री. अभंग यांची कविता स्वयंपाकघरांतील कानटोंचणीप्रमाणें (like curtain-lectures) परिणामकारक झाली आहे, असें ह्मणतां येईल. कविता लिहिण्यापूर्वीची त्यांची अवस्था मोठी चमत्कारिक असते. एखादा करुणप्रसंग वर्णन करण्यास उद्युक्त झालेलें त्यांचें हृदय, त्यांच्या चेहेऱ्यावरसुद्धां भावनांना प्रतिबिंबित करून, ढगांनीं व्याप्त झालेल्या आकाशांतील वातावरणाची जाणीव करून देई. काळ्याकुट्ट ढगांनीं भरलेलें आकाश जसें आतां लवकरच मोठा पाऊस पडणार याची इशारत देतें; व त्याप्रमाणें जसा, खरोखरच, मोठा पाऊस पडावा, त्याप्रमाणें सीता-तनय यांचें भावना प्रधान मुख काव्याचा पाऊस पडल्याशिवाय कधींही निवळत नसे. असो.

## वाचकांकरितां थोडेसें—

श्री. अभंग यांच्या कवितेंतील भाषा अगदीं साधी व रोज व्यवहारांत उपयोगांत येणारी अशीच आहे, व त्यांत कठोरपणा असा कोठेंच आढळत नाहीं. '**शेतकरीण**' (पान १४) ह्या कवितेंतील त्या शेतकरणीची खेडेगांवीं भाषा अगदीं हुबेहुब साधली आहे. खालील ओळी वाचल्यानें कवीनें स्वतां शेतकरणीच्या हृदयांत प्रवेश करून तिचें कसें यथायोग्य शद्बचित्र तिच्याच शद्बांत रंगविलें आहे, हें स्पष्ट होईल.

**"खायाला कोरड्यास न्हाई।**
**भाकर तुकडा कुठून येई।**

● ● ● ● ●

**कांवळ वाकळ न्हाइ निजाया।**
**धडूत कपडा बघ इकलाया**" ॥ वगैरे–

दारूच्या व्यसनानें धुंद झालेल्या एका शेतकऱ्याच्या घरांतील दीन व करुणास्पद परिस्थितीचें कवीनें या कवितेंत वर्णन केलें असून, तिच्या वाचनानें कवी "गिरीश" यांच्या "**अंबराई**' या काव्यांतील अशाच एका प्रसंगाची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. दारूच्या धुंदीत पैशाकरितां, तो शेतकरी आपल्या बायकोस व मुलास ठार मारितो; व शुद्धीवर आल्यानंतर त्यास कृतकर्माचा पश्चात्ताप होतो. अशा रीतीनें पश्चात्तापानें दग्ध झालेल्या त्याच्या अंतःकरणाची खळबळ तर कवीनें फारच सुंदर रीतीनें वर्णन केली आहे. व्यसनाच्या धुंदींत मनुष्य कोणाचीहि पर्वा करीत नाहीं. त्याच्याविरुद्ध पण हितकर मत देणारे मित्रसुद्धां त्यास शत्रुप्रमाणें वाटतात; हें कटु सत्य कवीनें त्या शेतकऱ्याच्या तोंडानें वदविलें आहे, तें असें:—

**"राजाइ जिवाची रानीं। वैरीन तवा वाटली.॥"**

दारूच्या धुंदीत केलेल्या दुष्कृत्याचा त्या शेतकऱ्यास जेव्हां पश्चात्ताप होतो, त्यावेळीं खालील उद्गार त्याच्या मुखावाटे बाहेर पडतात.

**"झनत्याल मला चांडाळ। पोटचं पोर मारलं॥"**

**“ इक्त्यांत नव्हती मरनार । म्यां-म्यांच असं मारलं ॥ ”**

शेवटीं त्या दारुड्या शेतकऱ्यास उपरती होते, व तो ह्मणतो:—

**“ मी न्हाई दारु पेनार । दारुला न्हाइ शिवनार ” ॥**

कवी अभंग याचा दुसरा विशेष असा कीं, त्यांच्या कवितेंत नेहमीं कांहींतरी तत्व किंवा सार निघतें; व तें सहसा शेवटच्या दोन किंवा चार ओळींत गुंफलेलें असतें. ज्याप्रमाणें इंग्लिश सॅनिट्स् मध्यें शेवटल्या ओळींत एकदम काव्याचा ओघ बदलविला जातो, त्याप्रमाणें यांच्याही कवितेंत कित्येक उदाहरणें आपणांस सांपडतात. अभंग यांना नेहमीं कांहींतरी नवीन सांगावयाचें असतें, व ह्मणूनच कवितेच्या शेवटच्या दोन चार ओळींत ते अगदीं निराळेंच विचार वाचकांपुढें मांडितात.

‘ **गोपालन** ’ ( पान २ ) हे चार साधे अभंग आहेत. अगदीं पुराणकाळांत शिरून हळूहळू त्यांनीं आजच्या वातावरणावर त्या अभंगांत आपलें सार गोंवलें आहे, तें असें:—

**“ हिंद मायभूमी दीन गाय झाली ।**<br>
**कोण हाय ! वाली संकटांत ? ॥**<br>
**अवना तियेच्या सख्या नारायणा, ।**<br>
**हे जगज्जीवना धांव घेई ॥ ५ ॥ ”**

तसेंच “ **पूतना मावशी** ” ह्या पौराणिक प्रसंगाच्या गीतांत, त्यांनीं शेवटीं पहा कसा ओघ बदलला आहे तो:—

**“ बाळ स्वराज्य भू-( हिंद ) देवीचें ।**<br>
**पाजावया नोकरशाहिचें ।**<br>
**यत्न मायावि किति चालले । गडे मज .... ”**

‘ **पूतना—मावशी** ’ ( पान ५ ) ही कविता फार सुंदर वठली आहे. ह्या कवितेंतील पूतना मावशीनें केलेलें तान्ह्या कृष्णाचें वर्णन फारच परिणामकारक झालें आहे. ही कविता वाचतांना कवी ‘ गिरीशां ’च्या ‘ **शूर्पणखा** ’ ह्या कवितेची आठवण होते.

**‘ हिंदुस्थानची मकर संक्रांत ’** ( पान ३ ) ह्या सुंदर कवितेंत कवीनें खऱ्या संक्रांतीबद्दलचें आपलें मत जाहीर केलें आहे, तें असें:—

**“ साधाल सर्व ऐक्य ।**
**मिळवाल हो स्वराज्य ।**
**संक्रांत गोड गोड ।**
**तिज नाहिं नाहिं जोड ”** ॥ ७ ॥

**‘ उंदरामांजराचा खेळ ’** ( पान ८ ) ही कविता वर्णनपर असून, त्यांतील रूपक कवीनें आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें शेवटच्या चार ओळींत उघड करून दाखविलें आहे.

आपल्या स्वातंत्र्य गीतांत, सीता--तनय यांनीं, हिंदुस्थानच्या सध्याच्या राष्ट्रीय लढ्याचें सुंदर वर्णन केलें आहे. ‘केसरीं’त आलेल्या त्यांच्या **‘ अद्‌भुत रणसंग्राम ’** ह्या कवितेंत आजच्या निःशस्त्रप्रतिकार या तत्वां-वर उभारलेल्या राष्ट्रीय लढ्याचें उत्तम चित्र रंगाविलें आहे, तें वाचकांनीं मुळांतूनच वाचल्यास बरें !

**‘ स्वातंत्र्य–समर ’** (पान७) ह्या कवितेंत त्यांनीं ह्मटलें आहे:—

**“ स्वातंत्र्य भरतभूमीचें । जें अमोल भूषण साचें ॥**
**अपहरण तयाचें झालें । माशानें माणिक गिळिलें ॥ ”**

निःशस्त्र प्रतिकार ह्या चालू स्वातंत्र्ययुद्धाच्या मूळ तत्त्वांसंबंधीं त्यांच्या **‘ नरकेसरी ’** ( पान १० ) ह्या कवितेंत त्यांनीं ह्मटलें आहे:–

**“ केवळ शस्त्ररहित या संग्रामीं हिंदु काय कार्य करी ।**
**पंडित जवाहिरासम एकच करि वीर चकित सृष्टि जरी ॥३॥ ”**

**‘ विरहिणी ’** ( पान २२ ) ह्या कवितेंत एका जुन्या पद्धतीच्या कुटुंबांतील स्त्रीवर केलेल्या असह्य जाचाचें वर्णन आहे. त्या स्त्रीचा नवरा सत्याग्रही असून तो पुढें तुरुंगांत जातो; तेव्हां तिचा घरीं कसा छळ केला जात असे, व शेवटीं ती जिवास कंटाळून स्वतांस कसें जाळून घेतें, हें

तिच्याच शद्वांत कवीनें वर्णन केलें आहे. घरांत तिला खालील शद्वांत सारखीं टोंचणी चाललेली असतेः-

" मुलास तूंच घालविलास ।
बाइगं कवटाळिण तूं खरी " ।

• • • • •

" प्रेमा पर पुरुषा.... ..... ।

• • • • •

" तेच ग वैनींचे प्रिय × × × ॥ " वगैरे.

तशा त्या परिस्थितींत तिला स्वदेशसेवा करणें अशक्य असतें, व ह्मणून ती ह्मणतेः—

" स्वदेशी " उच्चारणें । पातक व्रत आचरुं मी कसें ? ॥

शेवटीं कवीनें आपल्या हिंदुसमाजांत पतीविरहित स्त्रियांना कसा जाच होतो, हें लोकनिदर्शनास आणिलें आहेः—

" पत्नी पतीविण जगीं उपहासपात्र ।
रीती जगाचि बघुनी मन होई क्षुब्ध ॥ "

'**मृत्युशय्येवर**' ( पान २९ ) ह्या कवितेंत एका सत्याग्रही-वीराचें मृत्युशय्येवरील उच्च विचार वाचकांपुढें मांडलें आहेत. मरण-समयींच्या असह्य वेदनांचो तो विलकुल फिकीर करीत नाहीं आपल्या मातेसंबंधीं त्याचे उद्गार फारच हृदयस्पर्शी असे आहेतः—

" तुझ्या पुण्यें मज स्वर्ग प्राप्त झाला ! "

मरतांना तो आपल्या पत्नीस उद्देशून ह्मणतोः—

" हिंदसेवाव्रत नको नको ; सोडूं ॥ "

त्याचे शेवटचे शद्व तर त्याच्या उत्कट स्वदेशप्रेमाची आपणास जाणीव करून देतातः-

> "अतां बोला 'जय गांधि महाराजा'
> पदीं प्रणती निष्काम आज तूझ्या ॥
> नाहिं आतां सेवेस बा, आयुष्य ।
> तुझें नामचि... हें एक अतां... लक्ष्य. ॥"

'**निरोप**' ( पान ३१ ) ह्या कवितेंतील उपमा फारच चांगल्या साधल्या आहेत, व त्यांतील शेवटचें कवन ह्मणजे करुणरसाची कमाल झाली आहे.

'**स्वर्ग**' ( पान ३१ ) ह्या कवितेंतील एका सत्याग्रही स्त्रीनें तुरुंगांत असतांना आपल्या स्थितीचें वर्णन केलें आहे. ती ह्मणतेः--

> "पिळदार सूत काढुनी । सुतानें स्वर्गचि लाभे अहा ॥
> शिवले न चहा कॉफिला । परदेशि तुच्छ वस्तुला ॥"

● ● ● ● ●

> "हें पीठ चार पायली । दळण्यास नाहीं लाजली ।
> तंव प्रिया नाहिं भागली ।... ... ... ... ...."

शेवटीं त्या प्रेमळ पत्नीनें भोळ्याभाबड्या मनानें प्रेमाचें द्योतक ह्मणून आपलें हृत्पुष्प वाऱ्याबरोबर आपल्या पतीस भेट ह्मणून पाठविलें आहे. येथें कवीनें प्रेमीजनांचें मन कसें असतें, हें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

'**स्वयंसेविका**' ( पान २४ ) ह्या कवितेंत कवीनें एका सत्याग्रही स्त्रीचें फारच सुंदर व करुणाजनक शद्बचित्र काढिलें आहे. ती ह्मणतेः--

> "सुत कालच गेला सोन्याचा जाहला ।
> कारागृहिं अन्न त्यागुनि वीर मृत्युला ॥
> ते गेले त्यांच्या उरिं गोळी लागली ।
> ही प्रिया तयांची कर्तव्या जागली ॥"

" गा, गाच अतां ग, ' झेंडा उंचा रहे " ।

● ● ● ● ●

" तो ऐका, सुटला हुकूम ' लाठी हाणा ' । "
हालुं नका इथुनि कुणि मायभूमिच्या आणा ॥ "

' ध्येय आणि मरण ' (पान १७) व 'मृत्यूशय्येवर' (पान २९ ) या दोन कवितामध्यें करुणरस अतीशय परिणामकारक झाला आहे.

' बालसत्याग्रही '— ( पान ४३ ) ह्या सुंदर कवितेंत एका छोट्या पोराचे आपल्या बोबड्या भाषेंतील विचार वाचकांच्या पुढें मांडले आहेत. ही कविता वाचतांना प्रथम थोडें हासूं येतें. त्या बोलक्या पोराचें कौतुक वाटून, त्याच्या अज्ञानाबद्दल मौज वाटते. आपल्या आईवरील त्याचे प्रेम व निष्ठा ही कौतुकास्पद वाटतात; देवघरांतील देवावरील त्याची श्रद्धा खालील ओळींत कवीनें मोठ्या मार्मिकतेनें, दाखविण्याचा प्रयत्न केला आहे; तो ह्मणतो:—

' आई शांगिल देवाला ।
देवाल्यांतिल शगल्याला ॥

● ● ● ● ●

मग देवच्च येऊन मालिल तुम्मा ।
हाती घेऊन काथीला ॥ '

लहान मुलांचे बोबडे बोल आपणांस महत्वाचे वाटत नाहींत. ' त्या शेंबड्या पोराला काय कळतंय? ' असें ह्मणून आपण त्याची हेटाळणी करतो; परंतु कवींना मात्र लहान मुलांच्या बोबड्या वाणींतही एखादें मोठें गूढ कोडें दिसत असतें, व तें सोडविण्याचा ते सारखा प्रयत्न करीत असतात.

शेवटीं महात्माजींची प्रस्तुतची सत्याग्रहाची चळवळ व त्यांची उदात्त तत्त्वें थोरापासून अगदीं लहान मुलांच्यासुद्धां अंतःकरणांत जाऊन कशी रुजली आहेत हें पुढील ओळीवरून चांगलें निदर्शनास येतें.

## वाचकांकरितां थोडेसें—

" आमी कुनाला बोलत नाई ।
आमी कुनाला मालत नाई ।
बोलता आमा येतच नाई ।
मालता आमा येतच नाई ।
म्हणून पेका तुमीहि आमुती ।
कालजी अशे देवाला ॥ "

कवी अभंग यांनीं आपल्या कवितांना नांवेंही मोठीं सुबक व यथायोग्य दिली आहेत. ह्या कवितासंग्रहास त्यांनीं मोठ्या विनोदानें " **मेजवानी** " हें नांव दिलें आहे. शिवाय त्यांच्या कवितांच्या चालीहि निरनिराळ्या प्रकारच्या असून त्यांची प्रसंगानुसार निवड करण्यांत आली आहे. अगदीं अभंगापासून सुरवात करून, शेवटीं शेवटीं अगदीं आधुनिक पदांच्या चाली योजिल्या असून '**हिंददेवीची निर्वाणीची विनवणी**' या भैरवीनें शेवट मोठा गोड केला आहे. प्रत्येक प्रसंग परिणामकारक आहे. प्रसंगाची विविधता कवीच्या: आंगच्या कल्पकतेची जाणीव करून देते.

असो. श्रीयुत अभंग यांच्या कवितेवर जितकें लिहावें तितकें थोडेंच आहे. कवींनीं वाचकांच्यापुढें आपल्या काव्यसंग्रहसाहित्याची 'मेजवानी'च तयार करून ठेविली आहे. प्रस्तुत मेजवानीच्या प्रसंगीं रासिकांना आमंत्रण करण्याचें काम माझ्याकडे आलें आहे व तें मी मोठ्या आनंदानें स्वीकारिलें आहे. तर मग मी उगीच खोळंबा न करितां 'उठा' म्हणून सर्वांस विनंती करितों.

## मेजवानी

जातां जातां श्रीयुत कृष्णाजी मोरेश्वर जोशी-प्रोप्रायटर सातारा ' सिटीप्रेस ' यांनीं पुस्तकाची सुंदर छपाई केल्याबद्दल त्यांचे व ब्लॉक प्रिंटिंगचें काम पुण्याच्या गणेश महादेव कंपनीनें वेळेवर दिल्याबद्दल रा. ग. म. वीरकर यांचेही आभार मानून माझी लेखणी आटोपती घेतों.

मकर संक्रांत
शके १८५२.
सातारा.

**गोविंद विनायक राजगुरु.**

## शुद्धिपत्रक

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १३ | १ | चला | चाल |
| १७ | ९ | विरोध | विनंति |
| २८ | ५ | कच-संभार | कच स्नेहार्द्र |
| २८ | १५ | दिल्यावरि तिची | दिल्यावरी मग तिची |
| ३३ | २० | लास त्या | लास द्या त्या |

# अनुक्रमणिका

**गीतें**


| | पृष्ठ |
|---|---|
| वंदन | १ |
| गोपालन | २ |
| हिंदुस्थानची मकरसंक्रांत | ३ |
| अद्भुत रणसंग्राम | ४ |
| पूतना मावशी | ५ |
| स्वातंत्र्य-समर | ७ |
| उंदरामांजराचा खेळ | ८ |
| नरकेसरी | १० |
| संदेश | ११ |
| आमचा बाणा | १२ |
| खेडगांवचें पिकेटिंग | १३ |
| शेतकरीण | १४ |
| पस्तावा | १५ |
| ध्येय आणि मरण | १७ |
| अखेर निराशा | १९ |
| राष्ट्रीय निशाण | २० |
| विरहिणी | २२ |
| स्वयंसेविका | २४ |

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| स्वर्ग | २६ |
| हुर्हूर | २८ |
| मृत्युशय्येवर | २९ |
| निरोप | ३१ |
| तुरुंगाच्या कोठडीत | ३३ |
| निकाल | ३५ |
| मच्छीमारी | ३७ |
| भिक्षेकरीण | ३९ |
| कानउघाडणी | ४१ |
| बालसत्याग्रही | ४३ |
| भिक्षा | ४५ |
| लालाजी— | ४७ |
| हिंददेवीची निर्वाणीची विनवणी | ४९ |
| सत्याग्रही संक्रान्त | ५० |

# मेजबानी

# राष्ट्रदेवो भव।

ज्यांनीं अखिल हिंदुस्थानच्या अभ्युदयार्थ, स्वतःच्या
अढळ आत्मविश्वासाच्या बळावर प्रस्तुतचा
राष्ट्रीय लढा चालवून मातृभूमीच्या
अनेक पुत्रांना त्यांच्या अंगच्या
सत्व, धैर्य, शील, पराक्रम, निर्भयता
इत्यादि गुणांच्या कसोटीस यशस्वी
रीत्या उतरण्याचा प्रसंग आणून देऊन
'हा लढा अभूतपूर्व' म्हणून जगाच्या तोंडून
वदविलें आणि कांहीं काळ स्तिमित केलें त्या जगद्वंद्य

## महात्माजी-


वांचून दुसऱ्या कोणास
लेखणीची ही सर्व सिद्धता अधिक आनंद
देईल !

त्र्यं. रा. अभंग

# मेजवानी

[ चालः—‘ पांडवा संम्राट पदाला ]

हिंददेवीच्या घरीची मेजवानी ही तुह्माला ॥
कुणिहि यावे तृप्त व्हावें जेवुनी कोण्याहि काळीं ॥
गांधिजी यजमान येथें सिद्ध हो सत्स्वागताला ॥
सत्व शिलाची कसोटी तत्सुतांनीं लावुनी ॥
तद्विमोचनि थोर विक्रम, धन्य ! ज्यांनीं गाजवीला ॥
रोमहर्षणशा प्रसंगांचा शिधा परिपाकिला ॥
वल्लवाचें कार्य माझें फक्त तें सांगू कशाला ? ॥
सिद्धही सपात्रपंक्ती भोजनाला या चला ॥
तुष्ट व्हा मग घाल अशी तोच मज ठेवा मुलाला ॥
राष्ट्रदेवीच्या घरीची हीच भाजी भाकरी ॥
मानुनी घ्यावी; परान्ना गोडशा सेवा कशाला ? ॥



# मेजवानी

॥ श्री ॥

## वंदन

[ अभंग ]

सिद्धि विनायक । सर्व विघ्नें संहारक ॥
शक्ति बुद्धीचा दायक । चरणिं त्याच्या हें मस्तक ॥
काय मी पामर । लिहिन स्वातंत्र्य–संगर ॥
तोच लिहविता । मग कां न यशस्विता ॥

२

मानसाच्या सरीं । स्फूर्ति–पंकज ये वरी ॥
ज्ञानरवीच्या प्रकाशें । संवर्धित होत असे ॥
मधु मधुर तयांत । ईशकृपा हेलावत ॥
जरि त्रेधील रसिक । तरिच होईल सार्थक ॥

३

कुणी देह राष्ट्रकार्या । कुणी राशी धनाचिया ॥
कुणी त्याग संसाराचा करुनि होम सर्वस्वाचा ॥
राष्ट्रकार्य लोककार्य । मानियले शिरोधार्य ॥
त्यांच्या सेवेच्या पुष्पांचा । हार भूदेवी-कंठिचा ॥
तुलसिपत्र मम सेवा । मान्य करूनी घे देवा ॥
जनजनार्दन । आतां व्हावें सावधान ॥

# गोपालन

[ अभंग ]

गोपाळांचे मेळीं, गोकुळीं मुरारी । गोवर्धनधारी गाई राखी ॥
मुरलीरवानें आकर्षोनी मनें । नाद-ब्रह्म तेणें व्यक्त केलें ॥
गाई गोपासंगें गोपाळ खेळला । धन्य ज्यांनीं डोळा देखियेलें ॥
कंसाला मर्दोनी सद्गती दिधली । मायबापें केलीं बंधमुक्त ॥
मानील एकची गाय आणि माय । रक्षी सत्य सत्य आर्यपुत्र ॥

२

गवळी श्रीकृष्ण द्वारावती स्थापी । शत्रु सर्व दापी बाहूबलें ॥
वायूसवें कृष्णकीर्तीचा सुवास । मोही भीमकीस येऊनीयां ॥
वाग्दान शिशुपाला रुक्मी देता झाला । जीव होत गोळा भीमकीचा ॥
भावाचा भुकेला संकटी धावला । रक्षाया वधूला वेगें आला ॥
दुंदुभी जयाच्या रणीं वाजवून । शौर्ये नारायण वंद्य झाला ॥
भिमकाची बाळा रुक्मीणी वेल्हाळा । दिली नंदबाळा सोहळयानें ॥

३

द्रुपद-दुहीता पांडवांची कांता । सभेंत जाचितां धांवा करी ॥
' दुष्ट दुःशासन फाडितो वसन । करा, या, शासन, बंधूराया ॥
दीन अबला मी गाईपरी झालें । अजूनी ना कळे कैसें देवा?, ' ॥
हांक भगिनीची भक्तीची ऐकिली । सिद्ध वनमाळी रक्षावया ॥
वस्त्रा मागें वस्त्र देखूनी शंकला । दुष्ट वरमला अंतरांत ॥

४

विराटाच्या गाई कौरव ग्रासिती । जागवी श्रीपती पांडवाला ॥
अर्जून निमित्तमात्र करोनिया । गाई रक्षियेल्या विराटाच्या ॥
गाईच्या रक्षणा कृष्णराणा आला । गोपाळ गाजला जगामाजी ॥
हिंद मायभूमी दीन गाय झाली । कोण हाय ! वाली संकटांत ॥
अवना तियेच्या सख्या नारायणा, । हे जगज्जीवना धांव वेगीं ॥

मेजवानी

# हिंदुस्थानची मकरसंक्रांत [चालः–'आनंद कंद']

संक्रान्त ही कुणाची ? कां हिंद बांधवांची ॥ धृ० ॥
तिळगूळ कोण कोणा । देणार हें कळेना ॥
पश्चिम दिक् कुणाची । स्वीकारि कोणि प्राची ॥ १ ॥
स्वातंत्र्य याचि कोणी । कोणी स्वराज्य वानी ॥
दुहि हिंदु मुस्लिमांची । अस्पृश्य कोणि जाची ॥ २ ॥
संक्रान्त ह्या अशांची । ऐक्याविना कशाची ॥
होणार हो मजेची । मधु माधुरी न साची ॥ ३ ॥
युग हें नसें रणाचें । गुज गोष्टि बोलण्याचें ॥
आहे क्रमें क्रमेंची । घटि ध्येय–साधनाची ॥ ४ ॥
सुटका न [1]मूषकाला । मृगराज रोधकाला ॥
विजयी विलीनताची । महती कृतज्ञतेची ॥ ५ ॥
ठेवा सदैव चित्तीं । जन हो तुह्मा विनंती ॥
ऐक्य प्रवर्तकांची । संक्रान्त हो मजेची ॥ ६ ॥
साधाल सर्व ऐक्य । मिळवाल हो स्वराज्य ॥
संक्रान्त गोड गोड । तिज नाहिं नाहिं जोड ॥ ७ ॥

---

१ मराठी तिसऱ्या पुस्तकांतील उंदीर आणि सिंह ही गोष्ट वाचकांच्या ध्यानीं असेलच.

# अद्भुत रणसंग्राम ! [ चाल:–‘ माझी गांधी टोपी ’ ]

अद्भुत रणसंग्राम ! वीरा अद्भुत रणसंग्राम ! ॥ ध्रु० ॥
येथें नाहीं भाला बरची
गरज न कोणा समशेरीची
तशीच गोळी बघ बंदुकिची
बार मुळिं न उडणार ॥ वीरा अद्भुत रणसंग्राम !
तोफेचें मग नांव कशाला ?
अश्वगजांच्या तशाचा शाला
टक्कर दगडांच्या बुरुजाला
कुणि न इथें देणार ! ॥ वीरा अद्भुत रणसंग्राम !
नाहिं अघाडी नाहिं पिछाडी
किल्ल्याचे तट कोणि न फोडी
खंदक खणुनी कोणि न कोंडी
शस्त्ररहित संग्राम ॥ वीरा अद्भुत रणसंग्राम !
नको उगारूं हात कुणावर
शब्दांनाहि असुं दे आवर
व्रत स्वदेशी पुरतें आचर
धरि अंतरिं अभिमान ॥ वीरा अद्भुत रणसंग्राम !
सदा स्वदेशी वस्तू–सेवन
सदा स्वदेशी वस्तू–विरचन
सदा अनादरि परावलंबन
स्वतंत्रता जगिं प्यार ॥ वीरा अद्भुत रणसंग्राम !
हिंदभूमिची सात्विक कीर्ती
सात्विकतेची गांधी मूर्ती
युद्धाची ही सात्विक स्फूर्ती
प्रभुवर जय देणार ॥ हा असा अद्भुत रणसंग्राम !

# पूतना मावशी

[ चालः– शूर्पणखेची ]

पान्हा फुटे मज कान्हा पाहून गडे । पान्हा फुटे बाळ पाहून ॥ ध्रु० ॥

टकटका बघे मजकडे ।
बघ लबाड हंसतो गडे ।
किती मोहक हें छबकडे । गडे मज । पान्हा० ॥१॥

पान पिंपळ शिरिं सुंदर ।
केश कुरळे रुळती वर ।
कांति श्यामल वेड लाविते । गडे मज । पान्हा० ॥२॥

तीट बारीक भालावरी ।
तशि गुलाबि गालावरी ।
ओंठ डाळिंबि रंगावरी । गडे मज । पान्हा० ॥३॥

इवल्याशा सुवर्णांगुल्या ।
रत्नखड्यांनीं बघ जडविल्या ।
किती बोटांत दिसती खुलून । गडे मज । पान्हा० ॥४॥

पायांमधील घुंगूर वाळे ।
बाळ हळूं हळू जंव चाले ।
'रुणु झुणुं' नादें टाकी मोहून । गडे मज ॥ पान्हा० ॥५॥

चल ये, रे, दे रे, गोडसा ।
यशोदेच्या जिवा पाडसा ।
मावशी मी आले तुज घ्याया । गडे मज ॥ पान्हा० ॥६॥

नंद–राणीचा भोळा भाव ।
बाळ स्वाधीन करि अभिनव ।
घेई प्यायास प्राण कंठि आले । गडे मज । पान्हा० ॥ ७ ॥

× × × ×

## मेजवानी

बाळ स्वराज्य भू-( हिंद ) देविचें ।
पाजावया नोकरशाहिचे
यत्न मायावि किती चालले । गडे मज ॥ पान्हा० ॥



# स्वातंत्र्य--समर

[ चाल:--न्याहरीच्या गाण्याची ]

व्हा सज्ज विजय मिळवाया    धन्य, धन्य, जगतीं व्हाया ॥ धृ० ॥
स्वातंत्र्य भरत भूमीचें    जें अमोल भूषण साचें ॥
अपहरण तयाचें झालें    म्हाशानें माणिक गिळिलें ॥
प्राप्त्यर्थ यत्न करतांना ।
जाहली अटक गांधींना ।
दगडांचा बंदीखाना ।
मनिं म्हणेल पाझरुनीयां    ' हें स्थान अशा पुरुषा या ॥

२

हा सागर जणुं शांतीचा    मेरु हा अचल धैर्याचा ॥
सत्यधर्मव्रततेजाचा    रविच हा भरतभूमीचा ॥
लागलें ग्रहण या काला    पुण्याइ सिद्ध मुक्तीला ॥
ज्या स्मशान, गृह एकच ।
ज्या बंध, मुक्ती एकच ।
ज्या दगड, रत्न एकच ।
त्या मी न सिद्ध बांधाया    तो स्वतंत्र संतत आर्या ॥

३

लोहासम कठिण चिरे हे    रक्षितील गांधी स्नेहें ॥
वीरांनों कार्य करा जा    राष्ट्रार्थ जीव द्या, जा, जा, ॥
जा, करा सहन हल्ल्यांना    धैर्यानें कार्य करा ना ॥
प्रतिकार नका हो करूं ।
मनि भीति नका हो धरूं ।
स्वार्थास नका स्वीकरूं ।
स्वातंत्र्यसमर जिंकाया    वीरानों, अभिमुख या ' या ' ॥

# उंदरामांजराचा खेळ !

[ दिंडी ]

मांजराच्या ताब्यांत सांपडलेल्या एका उंदरानें आपली एक कर्म कहाणी जीव मुठींत धरून मोठ्या मुष्किलीनें सांगितली ती आपणांस सध्याच्या कालांत उद्बोधक होईल असें वाटल्यावरून पुढें देत आहे. कदाचित कुणी स्वयंसेवकानें प्रचार करतांनाही ती जनतेपुढें मांडली असेल!

" एक दिवशीं बाहेर खेळण्यास
आई संगें फिरण्यांत थोर हौस ॥
वाटुनीया घर मोडुनी निघालों
पाठशिवणी खेळांत गुंग झालों ॥१॥
कुणी जाई शेंगांत, डाळि कोणी
कुणी पोतें फोडून खालिं आणी ॥
जोंधळ्याचा मांडला कुणी फराळ
गहूं, बाजरि कुर्कुरें कांहीं काळ ॥२॥
खाउनीया मध्येंच पुन्हा खेळ
मांडूनीया झाला न अल्प काल ॥
लपुनि, छपुनी येऊन मांजरीजी
तिघा चौघा मुखिं धरुनि होत राजी ॥३॥
पुढें वदती ' मुळि नाहि दुजाभाव
चला खेळू आपणहि शिवाशीव ॥
नाहिं तुमच्या जीवास मुळीं धोका
येथ आलों खेळण्या; नको शंका ' ॥ ४ ॥
कितीकांना विश्वास नच पटून
पाय घेती काढतां हळु तिथून ॥
' आम्ही तुमच्या संरक्षणास आलों '
नका जाऊं खेळण्या पातलेलों ॥ ५ ॥

विरस आमुचा करुं नका तुम्ही ऐका
वैर मोठ्याशीं आणीतसें धोका ' ॥
आम्हि गेलों भाळून वचनिं गोड
खेळ केला सुरुं; त्यांत निघे तोड ॥ ६ ॥
' तुम्हांपैकीं बघु कोण पळे फार
देऊं बक्षिस जो क्षणीं जाई दूर ' ॥
मी पळालों करुनी अती शिकस्त
दूर जाऊन बैसलों जरा स्वस्थ ॥ ७ ॥
तोंच तेथें येऊन वदे काय,
' जोडिदारा हरविलें; धन्य ! धन्य ! ॥

अपयशाला पाहून तो पळून
जाइ केव्हां आलें न ही कळून ॥८॥
चला अतां आपुली थोर दोस्ती
चला खेळूं या प्रेमभरें कुस्ती ' ॥
खेळतांना जाहलें काय नेणें
शब्द बाहिर मुखिंचा अशक्य येणें ॥९॥
तोंच रुतला माने वरी सुळा तो
थोर (?) वचनीं विश्वसे जो खुळा तो ! ”

× × ×

हिंदवासी मनिं ह्मणे हा असेंच
आह्मि आमुचें स्वातंत्र्य गमविलेंच ॥
दोष आमुचा हा; नाहिं शासकांचा
' जिणें धिक्, धिक् ' कुंठते पुढें वाचा

# नरकेसरी

[आर्या]

नरकेसरी पकडिला
वीर जवाहीर-लाल धीर गडी ॥
स्वातंत्र्य-युद्ध करितां
जुलमी सत्ताधिकार तो रगडी ॥१॥
रक्षक नृपसत्तेचे
चळवळ देखोनि गांधिची असली ॥
कर्तव्य-मूढ बनले;
कोणा शासिती; कुणास वाट खुली ॥२॥
केवळ शस्त्ररहित या
संग्रामीं हिंदु काय कार्य करी ॥
पंडित जवाहिरासम
एकचि करिवीर चकित सृष्टि जरी ॥३॥
सर्वांनीं हिंदूनीं
पाहून तद्धैर्य युद्ध चालविलें ॥
गाजविलें नांव जरी
' हिंदु स्वातंत्र्य वीर ' तरिच भलें ॥४॥
रीति स्वातंत्र्याची
राजद्रोहीच शासकां दिसते ॥
तन मन धन अर्पावें
स्वातंत्र्य-सुसाधनार्थ आज सतें ॥५॥

## अनुष्टुप

नृसिंह जरि हो बद्ध । छावे येवोत ते पुढें ॥
पाश हे पारतंत्र्याचे । तुटो भारत सांकडें ॥१॥

## संदेश

[ चालः– ' सारंगी सारखा ' थोडा बदल करून ]

हें स्वागत तुमचें सारें । मज आतां लाभते ॥ ध्रु० ॥
मज निमंत्रण हें नृपाचें ।
थयिथयी हा हर्ष नाचे ।
मम मनोरंगभूमी हें । नाट्य नवें दाविते ॥ १ ॥
आजवरची लोकसेवा ।
विफल कसली होत देवा, ।
आदरातिथ्य राजाचें । भोगाया लाविते ॥ २ ॥
सर्व आला एक ठाया ।
तुम्ही भागीदार व्हाया ।
आनंद दुणावे माझा । मन डुलतें, नाचतें ॥ ३ ॥
लोकसेवा, ऐक, कांतें, ।
हृदयदेवी स्फूर्तिदा ते ।
जें भाग्य राजदरबारीं । बघ भालीं योजितें ॥ ४ ॥
तिष्ठवा कां ? राजदुता ।
मार्ग बरवा एक आतां ।
जा, करा राष्ट्रसेवा हो । यश मिळवा एक तें ॥ ५ ॥
हिंद सेवा संपवोनीं ।
रविहि जाई राजभवनीं ।
उगवेल भाग्यरवि जाणा । विलय निशा पावते ॥ ६ ॥
हाच तो संदेश माझा ।
नित्य हृदयीं वागवा जा ।
जाउं द्या बंदिशाला ती । विरहानें कष्टते ॥ ७ ॥

मेजवानी

# आमचा बाणा ! [ चालः– ' चला जाउ मुंबई शहरांत ' ]

नाहिं आह्मि कुणास हार जात ॥ धृ० ॥
गांधीजींची आज्ञा पाळूं ।
दारु, चहा, दुर्व्यसना टाळूं ।
कार्य कराया सर्वहि उसळूं ।
जेरिस आणुं त्यांना ॥ सत्वर ॥ १ ॥
व्रत देशिचें आचरुनीया ।
परदेशी व्यापार हाणूं या ।
नाक दाबुनी तोंड उघडूंया ।
अंकुश गज वळवी ॥ सत्वर ॥ २ ॥
हिंदी जनाना दडपा कितिही ।
लाठ्या मारा गोळ्या कुणिही ।
हले न तिथुनी जाता प्राणहि ।
हाच खरा बाणा ॥ आमुचा मर्दांचा बाणा ॥ ३ ॥
शपथ महात्मा गांधीजींची ।
कसुर रेसभर कर्तव्याची ।
करूं न आशा धरूं जिवाची ।
सत्याग्रही होऊं ॥ आह्मी ॥ ४ ॥



### मेजवानी

## खेडेगांवचें पिकेटिंग [ चलाः- मला मुंबईला जायचंय ]

चला समद्याजनी दारुड्यास्‌नी गं घालवून देऊं ॥ ध्रु० ॥

गांधी बावा आला,

तुम्हां सांगून ग्येला

" घाल्‌वा दारुडं " घालवून पाहूं । चला स० ..... ॥ १ ।

घरादाराची काइं

रया राहिली न्हाइं

दारूपायीं त्या धुळीस लागूं । चला स०....... ॥ २ ॥

पोराबिरा दुकाळ

बाटलीचा सुकाळ

गुराढोरास इकून देऊं । चला स० ...... ॥ ३ ॥

शेती भाती समुदी

इच्या पायीं कनुदी

कुण्या बापइनं दिली कां ठेवू ? । चला स०.......... ॥ ४ ॥

आई बाप न्हाई

सासु सासरा काई

बायकु दिली न ध्येनांत राहूं । चला स०.......... ॥ ५ ॥

आसली कसली दारू ?

चला दुकान् घेरूं

गांधीबावाचा ' जय जय ' बोलूं, । चला स०.... ..... ॥ ६ ॥

# शेतकरीण

[चालः– 'असा धरि छंद']

( दारू पिण्यास पैसे मागणाऱ्या आपल्या नवऱ्यास एक शेतकरीण खालील गाणें ह्मणते. )

' शोक दारूचा । नाहिं रं नाहिं कामाचा ॥ धृ० ॥
खायाला कोरड्यास न्हाई ।
भाकर तुकडा कुठून येई ? ।
दान इकलं, करूं तरी काइं ? ।
ख्योळ पैशाचा । ह्यो रसातळा न्यायाचा ॥१॥
कांबळ वाकळ न्हाई निजाया ।
धड्त कपडा बघ इकलाया ।
पैसा योकच ठेवुन् दिलाया ।
जिवाभावाचा । त्यो तुला कसा द्यायाचा? ॥२॥
आसुड, काटी मार काई ।
परान ठेविन तुझिया पाई ।
सोनकुल्या हा तुळजामाई, ।
तुझ्या पायाचा । आसरा आई घ्यायाचा ' ॥३॥
' टाक आदूगर योकच पैसा ।
लगविन न्हाईतर बघ ठोसा ।
नरडंच दाबिन चुटकी सरसा ' ।
' कसा द्यायाचा ! करूं नको रं घात जिवाचा ' ॥४॥

÷ ÷ ÷ ÷

आसुडाचे फट्कारे देउनी ।
मायलेकरां दूर करोनीं ।
पैसा कमरेचा पळवूनी ।
बोल झोकाचा । ' शोक ह्यो लई गमतीचा ' ॥५॥

# पस्तावा

[ चालः–न्याहरीच्या गाण्याची ]

( तोच शेतकरी दुसरें दिवशीं निशापाण्याची धुंदी उतरल्यावर घरीं येऊन आपली बायको व एकुलतें एक मूल मेलेलें पाहतो. तेव्हांची त्याची मनःस्थिती खालील कवितेंत मांडण्यांचा हा प्रयत्न आहे. )

" ह्मनूत्याल मला चांडाळ पोटचं पोर मारलं ॥ धृ० ॥
बगुनिशान् पिरित पोराचं भड्भडुन येउं लागलं ॥
भळ्भळा रगत आल्यालं म्या न्हाइ तवा पाहिलं ॥

धुंदींत दारुच्या दिला ।
फट्कारा जवा लागला ।
तिर्मिरी येऊनी त्येला ।

खालिं आलं काखमधून पोटचं पोर मारलं ॥ १ ॥
राजाइ जिवाची रानी वैरीन तवा वाटली ॥
आगुदरच मार मारुनी निपचीत करून टाकली ॥
पोराच्या दुधाचा पैसा जीविची ठेव पळविली ॥

कालच्या दिसाचि कमाई ।
नासली बाटली पाई ॥
सुद् राहिलि न्हाई न्हाई ।

कुठं ग्येलों कुनाला ठाव पोटचं पोर मारलं ॥ २ ॥
हतवर धडपडत आलों अन् बगा काइ पाहिलं ? ॥
राजाइ दाजिबा माझा रातींत मरुन बी ग्येलं ॥
इक्त्यांत न्हवति मरनार म्या— म्याच असं मारलं ॥

ह्यो कसाब झालों बगा ।
माय लेका देउनिशान् दगा ।
दारुला शिवुं नगा, नगा ।

तिच्या पाई येडा होऊन पोटचं पोर मारलं ॥ ३ ॥

# मेजवानी

ह्यो शोक असा दारुचा    कामाचं न्हाइ रं न्हाई ॥
बज्‌बजाविलं किति सांगूं    दिल ध्यानं न्हाई वं न्हाई ॥
कमति व्हता योकच पैसा    त्यो नेउन मिळविलं काई ? ॥

संग् गडी चार घेऊन ।
दारूचं गलास झोकुन ।
खिनाभऱ्यांत् तर्ररं होऊन ।

कुटससा पडून राहून    पोटचं पोर मारलं ॥ ४ ॥
मी न्हाई दारु पेनार    दारुला न्हाइ शिवनार ॥
ह्यें कुना कार्नि जानार    कोन् जिव्हाळ्याचं येनार ? ॥
पाटला खबर मिळनार    त्यो सुळीं मला धेनार ॥

घरदार मातिमोल ह्यें ।
लइ वंगाळ लई यसन ह्यें ।
कारभारिन् गुनी पोर ह्ये ।

खून् त्येंचा खून घेनार    दारुनं झालं वाटोळं ॥ ५ ॥

# * ध्येय आणि मरण [ चालः– कुठल्याशा रानी देख ]

कुठल्याशा गुत्त्यावरतीं । बालिका एक उभि होती । सज्ज ती ॥ धृ.॥
टकळीहि करें फिरवीत । काढिते नलमसें सूत ॥झरझरा ॥
जातीची नाजुक पोर । श्रीमंती त्यांतहि थोर ॥ खुलतसे ॥
परि साधें वस्त्र स्वदेशीं । नेसली खादिचें कैशी ॥ बालिका ॥
चेहरा ।
करून हांसरा ।
सुनिश्चय खरा ।
करुनि उभि येथें । मद्यप्यां विरोध करिते ॥ ही अशी ॥
तो पहा दारुडा कोणी । धिप्पाड येतसे दुरुनि ॥ धुंद तो ॥
ते डोळे त्याचे लाल । सोडिती अग्निचे लोळ ॥ वाटते ॥
भाळावर आठ्या तीन । वालुका प्रदेशी उंच ॥ नारळी ॥
चेहरा किती तो क्रुर । जणुं कर्दनकाळ समोर ॥ तो उभा ॥
लक्तरें ।
घालि आदरें ।
[1]स्थिती विस्मरे ।
निशा पाण्यांत । घरदार धुळिस मिळवीत ॥ चालला ॥
ती त्याची चर्या बघुनी । घाबरली नाहीं स्वमनीं ॥ सेविका ॥
जस जसा जवळि तो आला । घालिती गराडा त्याला ॥ त्या पहा ॥
तीं पहा नायिका बोले । " राहुं द्या अशा या वेळे ॥ व्यसन तें ॥
ही दारू तुमचा आमुचा । करित नाश सर्वस्वाचा ॥ थांबवा ॥
तीं मुलें ।
अन्न ना मिळे ।
वस्त्र फाटलें ।
म्हणुनि रडताती । कितितरी क्षुधेनें मरती ॥ तीं पहा ॥ "

---

* एका लघुकथेच्या आधारें १ त्याची स्वतःची परिस्थिती

‘ जा चला व्हा तुम्ही दूर । ना तरी प्रसंगचि घोर ॥ येईल ॥
लागु नका नादी माझ्या । तुडवीन पायिं, पडतिल ज्या ॥ आडव्या॥
मोकळा मार्ग मी करून । जाईन दारू झोकीन ॥ निश्चयें ॥
बघु नका परीक्षा माझी । पडु नकाच धोक्यामाजीं ॥ तुम्हि कुणी ॥
ती पुढें ।
बालिका पडे ।
काय तरी घडे ?।
म्हणुनी जन बघती । तो त्याची विचलित वृत्ती ॥ जाहली ॥
ती नजर तयाची तसली । जणु सुरी अंतरीं रुतली ॥ ती तिच्या ॥
क्षणएक घाबरी झाली । परि पुन्हा स्थीरता वरिली ॥ सत्वरी ॥
‘ दारू मी सेवित नाहीं । अधरामृत-पान मलाही ॥ देशील ’ ॥
हे शब्द तयाचे कानीं । पडतां ये भोंवळ नयनीं ॥ क्षण तिच्या ॥
क्षणि दुजा ।
वदे ‘ मान्य जा ’ ।
कडाडति विजा ।
गमे त्या काळीं । बालिका भूवरीं पडली ॥ नकळत ॥
डोक्यास दगड लागून । पडतांच रक्त वाहून ॥ चाललें ॥
कुणि वारा घाली कोणी ॥ जखमेवर घालुन पाणी ॥ बांधिती ॥
बेशुद्ध अशी जी पडली । ती नाहिं कधींही उठली ॥ त्यापुढें ॥
देहाची पर्वा नाहीं । ध्येयार्थ स्वजन धनाही ॥ सोडिलें ॥
तो ध्यास ।
नित्य हा ज्यास !
ध्येय मार्गास ।
लावितो ज्याला । ‘लागतें मरावें त्याला ॥ हें असें ’॥

# अखेर निराशा

[ चाल: लावणीची ]

" काशि मला अंबाबाई किव पावली ?॥ धृ० ॥
दारूचं यसन ह्ये गं सुटलं
मला वाटलं सुटतंय त्ये कसलं
परि किरपा आमावरी लई झाली । मला अंबाबाई० ॥१॥
पोरासुरा मैंदाळ् अतां खायला
येका वर्सात फेडूं करजाला
न्हाइ आमी बग्नार सावकर कंदी काळी । मला अंबाबाई० ॥२॥
कारभारी गुनी लई असती
गांधीबावाच्या ऐकुन गमती
कशि सोडून बेगी बेगी दारू दिली । मला अंबाबाई० ॥३॥
ह्ये आलंच घराकड बाई
कोंडे[1], कनसं उतरुनशान् घेई
ये हुर्डा भाजून, त्येना गरम् गरम् । मला अंबाबाई० " ॥ ४ ॥
" दादा न्हवत् आपलं त्येग आई
पल्याडला किष्णा; सांगू काई !
मी आल्ये बगून त्येनीं दारू पेली ॥ न्हाई अंबाबाई आह्मा पावली ॥ ५ ॥
धाड्दिशी अशी व ही पडली
आई गं झीट कांग आली
आतां करूं कसं आई, आई, आह्मां । आंबाबाई न्हाई किग पावली !



१ तिच्या मुलीचें नांव

# राष्ट्रीय निशाण

[चालः–'माझी गांधी टोपी' थोडी बदलून]

माझ्या कंठामधला प्राण । जाणा हें राष्ट्रीय निशाण ॥ धृ० ॥

गांधीजींचा चरखा यावरी !
तलम सूत काढतात ज्यावरी ।
धंदा ज्याचा देइ भाकरी ।
निशीदिन करीन ज्याचें ध्यान । जाणा तें राष्ट्रीय निशाण ॥

२

व्यसनें मजला व्यग्र न करिती ।
परदेशी कपडे न भुलविती ।
विलास लोकांचे नच दिसती ।
मनीषा करिते ही थैमान । उभारीन हें राष्ट्रीय निशाण ॥

३

पोलिस कोणी लाठी मारिल ।
पोलिस कोणी ठोसा मारिल ।
पोलिस कोणी दंडा मारिल ।
कुडी ही सोडिल यद्यपि प्राण । न सोडिन हें राष्ट्रीय निशाण ॥

४

एकुलता मी एक म्हणोनी ।
वृद्ध पिता तो पुढें येउनी ।
दीन होउनी आश्रु गाळुनि ।
होइल घरिं नेण्या हैराण । प्यार तरि हे राष्ट्रीय निशाण ॥

५

अति सुविनीता कांता येईल ।
पदर पसरुनी जरि ती विनविल ।

मेजवानी

नेत्र आंसवे 'डंव' 'डंव' करतिल ।
मनाचें सुटेल नच अवधान । मिरविन हे राष्ट्रीय निशाण ॥

× + ×

मैदानावर सत्त्वर येतां ।
झेंडा सत्याग्रही उमगतां ।
पोलिस प्रतिकारोनी दमतां
दंड–प्रहार करि बेभान । करांतुन गेलें राष्ट्र--निशाण ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 8232

# विरहिणी

[ चालः–'देव मी गणपती ग पाहिला' ]

( पती सत्याग्रहास गेल्यानंतरच्या आपल्या परिस्थितिचें कोणी स्त्री खालीलप्रमाणें वर्णन करीत आहे. )

" जीवन नको वाटे मला ।
सोसूं मी कुठंवर तरी ग छला ॥ धृ० ॥
आपण होतां तिथवरी ।
' स्वामिनी ! ' कोणींहि मानी जरीं ॥
जातांच सत्याग्रहास ।
झालें मी अपशकुनी कशितरी ॥
जायास राष्ट्रकार्याला
कांता आडविल कां कुणीतरी? ॥
जाणीव नसतें कां मनीं ।
जिवाची निश्चिति नाहीं खरी ॥
येईल कधिं कशि घडी ।
मस्तकी वैधव्य अशनीं पडे ॥
माहीत नसतां देतां ।
निरोपहि, हृदय किती धडधडे ॥
क्षणांत सासुबाइनीं ।
लावावा बोल असा या परी ॥
' मुलास तूंच घालविलास ।
बाइंग कवटाळिण तूं खरी ' ॥
भावोजी मधें येउनी ।
कडाडत आग पाखडती किती ?
' पसंत मज तुह्मि नसून ।
प्रेमा पर पुरुषा ......' ॥

वन्सनिं गांळि सोडावि ।
  "तेंच गं वैनिचे प्रिय .. ..." ॥
वाईट वाटे मामंजींना ।
  माझी ही पाहुनि झुरणि अशी ॥
प्रेमळ आई जी मुलास ।
  सासू कठिण कशी होतसे ? ॥
आश्चर्य वाटते मना ।
  कोलित लाविली कोणी अशी ? ॥
असह्य इथली दशा ।
  देवारे ! मुखिं वदवेना मुळीं ॥
भोगीत अशि काढतें ।
  दिन हे सुकलि मनाची कळी ॥
' स्वदेशि ' उच्चारणें ।
  पातक; व्रत आचरुं मी कसें ॥
सदेह प्राणेश्वरा ! ।
  वाटतें आपुल्याकडे यावेसें ॥
अशक्य ह्मणुनी क्षमा ।
  करा मज देह विसर्जित असे ॥
निर्मल प्रेमास काय ।
  दाहक पावक कधिं होतसे ॥

× ÷ ÷ ×

वसंततिलका–

लावून आग लुगड्यास जळून गेली ।
  ती बालिका, परि कुणा अिनि वाटते कां ?
पत्नी पतीविण जगीं उपहास पात्र ।
  रीती जगाचि बघुनी मन होइ क्षुब्ध ॥ १ ॥

---

१ दृष्टि पथांतील कोणिही तरुण

# स्वयंसेविका

[ चालः— तुझ्या बालमुकुंदें थोडी बदलून ]

" कुणि सांगा त्यांना येते सत्याग्रहा ।
विसरेन कशी प्रियकर वचनें मी अहा ॥
मज करणें आतां कोणाची काळजी ।
मज कोणी नाहीं झुरतिल मजसाठिं जीं ॥
सुत कालच गेला सोन्याचा जाहला ।
कारागृहिं अन्न त्यागुनि वीर मृत्युला ॥
ते गेले त्यांच्या उरिं गोळी लागली ।
ही प्रिया तयांची कर्तव्या जागली ॥
लक्षाची मिळकत ही तुह्मालाच घ्या ।
मी अर्पण करिते शुभमंगल घडिस या ॥
तो वाडा आमुचा, निवास तेथें असो ।
धन, धान्य, वस्त्र समृद्धि सेवका असो. ॥
या धरुं या तिजला ही मी-आलें पुढें ।
मज फिकीर नाहीं देह जरी हा पडे ॥
द्या, द्या तो आतां राष्ट्रिय झेंडा मला ।
मी उभारीन जरि काळ उभा राहिला ॥
हा, खबरदार, कुणी नकाच हात लावूं ।
हें 'राष्ट्रिय झेंडा—गीत' आह्मी गाऊं ॥
होऊं द्या वंदन मग सत्याग्रह करूं ।
जीवांत जीव तोवरी त्यास करिं धरूं ॥
गा, गाच आतां गं ' झेंडा उंचा रेहे ' ।
भिऊं नका मुळिंच कुणि विस्मित होतील हे ॥

## मेजवानी

तो ऐका सुटला हुकूम ' लाठी हाणा ' ।
हालूं नका इथुनि कुणि मायभूमिच्या आणा ॥
ते आले इकडे समाज ही पांगला ।
लाठींचा मारा जबर होऊं लागला ॥
बाळि पडले किंवा मज नेले पकडूनी ।
सरूं नकाच मागे राष्ट्रध्वज-रक्षणीं ॥
तीं पहा कुणाच्या लाठि शिरा लागली ।
तो खालीं पडला रक्तधार लागली ॥

*       *       *       *

बाळि लाठिस पडले किति त्यांची गणति कां ?
मर्मावर लागुनि मूर्च्छित ती सेविका ॥



# स्वर्ग

[ चालः– 'सुरेख संगम']

( सध्याच्या काळांत ' कारागृह ' **अपयशास्पद** मानले जात नसून ते '**यशोमंदीर**' मानलें जात आहे. दारुचें पिकेटिंग करीत असतां पकडण्यांत येऊन तुरुंगांत गेलेली स्वयंसेविका अर्थात्च खालीलप्रमाणेंच उद्गार काढील. )

स्वर्गचि लाभत अहा ॥ प्रिया मज ॥
तव वचनपालनें असा प्रियामज ॥ धृ० ॥
तव वियोग मज ज्या दिनीं
फिरविते टकळि तेथुनी
पिळदार सूत काढुनी ॥ सुतानें स्वर्गचि० ॥ १ ॥
शिवले न चहा कॉफिला ।
परदेशि तुच्छ वस्तुला ।
स्वातंत्र्य–मंत्र शिकविला ॥ प्रिया मज ॥ २ ॥
मद्याप्या परावर्तनीं ।
प्रवृत्त अशी होऊनी ।
सत्कार्य-साधनीं खनी ॥ सुखाची स्वर्गचि० ॥ ३ ॥
मी कारागृहवासिनी ।
आलें न कधी मन्मनीं ।
त्वन्मूर्ति हृदयिं पूजनीं ॥ सुधेचा स्वर्गचि० ॥ ४ ॥
हें पीठ चार पायली ।
दळण्यास नाहीं लाजली ।
तव प्रिया नाहिं भागली ॥ कां न मग स्वर्गचि० ॥ ५ ॥
राष्ट्र--प्रेम उज्वल खरें ।
हृदयिं या भरुनी उरे ।
स्वीकरा सुमन आदरें ॥ खरोखर स्वर्गचि० ॥ ६ ॥

स्वयंसेविका.



‘ मज फिकीर नाहीं देह जरी हा पडे ॥ ’

( पान २४ )

मेजवानी

हृत्पुष्प वायुसंगती ।
धाडिते खुळी मी किती ? ।
जरि गंध येई मागुती ॥ प्रियाप्रती स्वर्गचि० ॥ ७ ॥



# हुर्हूर !

[ सुनीत ]

भालीं कुंकुम चंद्रकोर, नयनीं त्या तेजवान् तारका
ओष्ठी सुंदर रक्तिमा खुलतसे चाफेकळी नासिक
मुक्तांचा सर गोल गोल जिचिया दंतावलीसी फिका
कर्णी मौक्तिक भूषणें, शिरीं कच-संभार सौगंधिक
शालू पातळ भर्जरी मधून ही डोकावते कंचुकी
कंठींची मणिमाळ तीवरि रुळे; ते कंकणांचे हिरे
हस्तीं ' चम्‌चम ' मुद्रिका करितसे दृष्टी ठरेना मुळीं
पायीं पैंजण ' रुण्‌झुणें ' जयिं पदक्षेपा करी सुंदरी
उद्यानीं बसुनी सचिंत युवती ही खिन्नता कां वरी
राष्ट्रा आत्मबलें सहाय्य करुं ही वांच्छा न कां हो पुरी ?
फेरी येत प्रभात पाहुनी जरा ती सत्य उल्हासली !
आतां कां कळि खिन्नतेंत फुलती ती हाय कोमेजली
बोलावून हळूंच संनिध दिली ती मुद्रिका सेवका
राष्ट्रा साह्य दिल्यावरि तिची राहील हुर्हूर कां ?

# मृत्यूशय्येवर

[ दिंडी ]

रुग्णावस्थेंतील कोणी एक सत्याग्रही ह्मणतोः—

" नका तुम्ही उपचार करुं कोणी
नका डोळ्यांना आणुं कुणी पाणी ॥
जीवनाचा क्षणिं तंतु मम तुटेल
तुह्मा सुजनांचा जिव्हाळा सुटेल ॥ १ ॥
शुश्रुषा ही नव मृदुल भावनेची
आजवरची अशि तुह्मा सेविकांची ॥
गोड सहवासें स्मरणिं येत नाहीं
माय -भगिनी--वात्सल्य--प्रेम कांहीं ॥ २ ॥
मायभूमी--स्वातंत्र्य--संगरांत
बाळ लढतां मृत्यूस मिठी देत ॥
हेंच सांगा आईस बाळ गेला
तुझ्या पुण्यें मज स्वर्ग प्राप्त झाला ॥ ३ ॥
तुह्मां, जातां, मम वल्लभा दिसेल
वाट पाहुनि बहु भागली असेल ॥
मूक हृदिंचा तद्भाव मज कळाला
घरुनि निघतां हृत्पटीं कोरलेला ॥ ४ ॥
तिला सांगा मुळिं कष्टि नको होऊं
हिंदसेवाव्रत नको; नको सोडूं ॥
तुला वरुनी अवलोकितां व्रतस्थ
हृदय होईल आनंदुनी तटस्थ ॥ ५ ॥
तुझ्या माझ्या यौवनाचा वसंत
राष्ट्रकार्यीं बाळा नसो उसंत ॥

देशभक्तींचे त्यास धडे देई
स्वकुलदीपक ज्या रीतिं धन्य होई ॥ ६ ॥
नको रागऊ जातो ह्मणून बाळ,
कोडकौतुक करण्यास नाहिं वेळ ॥
हिंददेवीची राखशील लाज
भग्वशानें मम चित्त शांत आज ॥ ७ ॥
आतां बोला ' जय गांधि महाराजा '
पदीं प्रणती निष्काम आज तूझ्या ॥
नाहीं आतां सेवेस वा, आयुष्य
तुझें नामाचि...हें एक आतां...लक्ष्य ॥ ८ ॥

\+ + +

असें ह्मणतां बाजूस मान गेली ।
जीवज्योती तत्काळ ती विझाली ॥



# निरोप

[चालः– 'उंच उंच रे पतंग']

" मायभूमि-मोचनास बाळ धाडियेला ॥
घेउनी निरोप बाळ जातसे रणाला ॥ ध्रु० ॥

आज अष्ट मास होत ।
वर्तमान नाहिं कळत ।
उजवि पापणीहि लवत
ताप दे मनाला ॥ मायभूमि० ॥ १ ॥

' आशिर्वच आइ! तुझें ।
कवच प्राणरक्षक जें ।
घालुनि हा वीर सजे ।
शत्रु जिंकण्याला ॥ मायभूमि० ॥ २ ॥

अढळ देशभक्ति ढाल ।
शस्त्र शांतता सुढाळ ।
क्रोध लोभ मोह–जाल ।
तोडुनी निघाला ॥ मायभूमि० ॥ ३ ॥

गांधि सैन्य–सूत्रधार ।
मायबाप प्रेम फार ।
लेकरासहित वीर ।
सिद्ध जावयाला ॥ मायभूमि० ॥ ४ ॥

घेऊं नको लवहि वेळ ।
नयन–बाष्प–बिंदु–माळ ।
थांबताच ओघळेल ।
या शुभ क्षणाला ॥ मायभूमि० ॥ ५ ॥

मिळविण्यास वैभव गत !
अट्टहास आज होत ।
बिंदु–मौक्ति–माळ जपुन ।
ठेवि लेकराला ॥ मायभूमि० ॥ ६ ॥

तुला पुन्हा प्रणाम आइ !
' रणास जा ' निरोप देई, ॥
हंसुनि गोड गोड समयिं ' ।
वदुनि बाळ गेला ॥ मायभूमि० ॥ ७ ॥

सान बाळ, धैर्य थोर ।
काय कार्य करिल पोर ? ।
अंजनिसुत रविसमोर ।
आठवे मनाला ॥ मायभूमि० ॥ ८ ॥

कौतुकें पहात त्यास ।
क्रमित बाळ जंव पथास ।
धन्य ! धन्य ! ! मम कुशांस ।
वीरबाळ आला ॥ मायभूमि० ॥ ९ ।

स्रवत नेत्र तों पुन्हाहि
थांबत हुर्हूर नाहीं
शांतता मिळे न कां हीं? ॥
कैशि काय वेळां ? ॥ मायभूमि० ॥ १० ।

\+ + +

सत्याग्रह मंडळाची ।
तार मृत्युची मुलाची ।
ऐकतां स्थिती सतीची ।
काय त्या क्षणाला ॥ मायभूमि० ॥ ११ ।

मेजवानी

# तुरुंगांच्या कोंठडींत

[ सुमंदार माला ]

न मागूं तुम्हां आह्मि केव्हांहि माफी
न हें आमुचें ब्रीद जें लांछन
स्वतःची प्रतिज्ञा अशी मोडूनी कां
जगीं वंचना घेऊं ती ऐकून ।
मुखें एक ' स्वातंत्र्य ' ' स्वातंत्र्य ' बोलेन
अतां प्रभो, एक ' स्वातंत्र्य ' दे
स्वयंसैनिकां भारताच्या असंख्यात
ये मृत्यु, केव्हांहि त्या येऊं दे
अशी पर्वणीं थोर–' स्वातंत्र्य संग्राम क्षेत्रांत '
ही मृत्युची ज्यास ये
जना नांव ठावें असो वा नसो त्यास
शांति खरी लाभलीही तयें
तनूची मनाची धनाची न पर्वा तिथें
मायबापाचिही ती नको
स्वयंसेवका माय, बंधू, भगीनी, पिता
हिंदेदेवी, दुजे त्या नको.
जया राष्ट्र–स्वातंत्र्य–संपादनीं देह
सोडावया ऐशि सत्संधि ये
कितीही छळा त्रास त्या कुणी
तन्मुखांतून ' स्वातंत्र्य ' ' स्वातंत्र्य ' ये
नका अन्न देऊं विधींही करूनी,
प्रहारा तरींही आह्मा सांगणें

मेजवानी

" कशाहि प्रसंगा न मागे सरा,
एक ' स्वातंत्र्य ' ' स्वातंत्र्य ' तें लाधणं "
न पर्वा जिवाची करू आह्मी सारे
नसो अन्न वर्षानुवर्षे घरीं
तनू ही स्वदेशास अर्पू; नको
पारतंत्र्यीं जिणें कंठणें यापरी



# निरोप.



‘सान बाळ धैर्य थोर। काय कार्य करिल पोर
अंजनिसुत रविसमोर। आठवे मनाला॥’

(पान ३२)

# निकाल

[ चाल:–'मानवा मोक्षाची आशा']

स्वतःच्या न्यायदात्या पित्यानें शिक्षा सांगण्यापूर्वी आरोपी मुलगा ह्मणतो:--

" बाबा ! विनंती तुह्माला
मुळि कचरुं नका हो, शिक्षा द्यायाला ॥
आरोपी राजद्रोहि असे
समजाच मला सुत मी तुमचाच नसे ॥
पाळा कर्तव्य सजा द्या
मग खुर्ची सोडुनि आलिंगनही द्या ॥
झालों सेवक देशाचा
मीं स्वयेंच, कांहीं दोष नाहिं तुमचा ॥
मरे तो स्वदेश सेवीन
तरि आपुला सुत मी सार्थक मानीन " ॥

\+ + +

" काळे पाणी सात वर्षे
ही शिक्षा ऐकुनि मानस मम हर्षे ॥
बाबा दया आतांच करा
या अवज्ञाकरा पोरावरति जरा ॥
पित्याला क्षमा याचना ही
मी अधिकाऱ्याला मागत नच कांहीं " ॥

\+ × +

पोलिस नेति आरोपीस
उसळीहि पित्याच्या ये वात्सल्यास ॥

# मेजवानी

उठोनि हृदयिं सुत धरून
क्षण पिल्लास येई पहा गहिंवरून ॥
अश्रुंनीं सुता स्नान घाली
स्वस्थळीं निघे सुत मोदें त्यावेळीं ॥



# मच्छीमारी

[ चालः–' कां उठतां खालीं बसा ' ]


परतंत्रपणाचा अफाट दर्या पहा
खवळला पहा ॥
या नौका स्वच्छंदानें जलविहार करिती अहा ॥ ध्रु० ॥
खवळून अशी गर्जना मेघवत् करी
केसरीपरी ॥
नभ घोर निनादें त्याच्या दुमदुमलें हें किति तरी ॥ १ ॥
त्या प्रचंड लाटा पहा पर्वतापरीं
अद्रिच्यापरी ॥
त्या क्षणांत नेतिल नौका वाटते समुद्रांतरीं ॥ २ ॥
ही मेघगर्जना पहा त्यांत भीषण
अधिक भीषण ॥
तम अधिकाधिक दाटूनी मुसळधार जलवर्षण ॥ ३ ॥
चपला ही ' चम्, चम् ' करी अशांतच कशी
निमिषभर कशी ॥
अंधकार तोडित जाई झर् झरा होत नाहिंशी ॥ ४ ॥
ते जाळे टाकुनि पहा समुद्रामधीं
जलधिच्यामधीं ॥
बेगुमान ' मच्छीमारी ' करिति हें जणूं पारधी ॥ ५ ॥
वर्षानुवर्ष क्रम पहा तयांचा असा
चालला असा ॥
हा रौद्ररूप जलराशी भेदरवुं शकेलहि कसा ? ॥ ६ ॥
स्वार्थाचें जाळे पहा आमिष फाकडे
भूलहि पडे ॥
त्या अल्पबुद्धि माशांना कोडें कां हे उलगडे ? ॥ ७ ॥

## मेजवानी

तें वरि जाळे ओढिलें बिचारे किती
बळि असे किती ॥
पडुनिया पहा कोळ्यांना ' मेजवानी'च घालिती ॥ ८ ॥

## अनुष्टुप

हिंदूची गरिबांचीही ।
सोन्याची भूमि सांपडे ॥
परदेशि जना साऱ्या ।
' मेजवानी'च ही घडे ॥



# ×भिक्षेकरीण

[ चालः–' प्रभूच्या कोपकहरांत ]

( नियोजित पती सत्याग्रही झाल्यामुळें रावबहादुरांशीं लग्न करावयास भाग पडलेली एक तरुणी, त्या सत्याग्रही तरुणाची एक वर्षानंतर गांठ पडून तो निघून गेल्यावर त्याच्या शोधार्थ फिरत असतां खालील गाणें म्हणते. )

" प्रभूला नाहिं कां बोला ? ।
कळवळा आमुचा आला ॥ ध्रु० ॥

दिनभरीं वणवणा फिरुनी ।
भेटला नाहिं हो अजुनी ।
जिवाचा जीव मम रुसला ।
सोडुनीं तो कुठें गेला । ॥ १ ॥

सकाळीं येउनी गेला ।
घराला काल तो आला ॥
' सुखी आहेस ना ? ' वदला ।
कुणी बैरागी त्या वेळां ॥ २ ॥

निरखुनी बघितली मूर्ती ।
आणि ओशाळले चित्ती ॥
परी भिक्षेकरी गेला ।
अंतरा देउनी झोला ॥ ३ ॥

जिवाला जीव जो जडला ।
अशानें कां कधीं तुटला ? ॥
गाडिं घोड्यांत कां रमला ? ।
झुरतसे भेट घेण्याला ॥ ४ ॥

जगीं तेजस्विता जाई ? ।
मामलती रावबहादुरी ॥

---

× एका लघुकथेवरून.

त्यागुनी देश सेवीला ।
धरुनि राष्ट्रीय वृत्तीला ॥५॥
शिक्षणा सोडुनी गेला ।
पारखा होत मर्जीला ॥
धरुनि बावांनिं घालविला ।
पुन्हां तो पोरका झाला ॥६॥
अर्पिलें राष्ट्र–सेवेला ।
वीर सत्याग्रही झाला ॥
देत व्याख्यान लोकाला ।
कोप सरकारचा झाला ॥७॥
सक्त मजुरीस ना भ्याला ।
एक वर्षानिं तो आला ॥
धरी वैरागि वृत्तीला ।
आतां भिक्षाटनीं रमला ॥८॥
अर्पिलेलें मनोभावें ।
हृत्सुमन कुस्करून गेलें ॥
अल्प कालें परेच्छेनें ।
रावबहाद्दुरिण झाले ॥९॥
जयीं दृष्टीस ती त्यांची ।
पडे मूर्ती तयीं गेलें ॥
स्वगृहा सोडुनी फिरते ।
अशी त्यांच्याच शोधाला ॥१०॥
एक घाला तुह्मी भिक्षा ।
पाहिले कां ? तुह्मी सांगा ॥
कुण्या वैरागि युवकाला ।
कधिं जिवाच्याच कलिजाला" ॥ ११ ॥

# कानउघाडणी

[ चालः–' घुंगुर पायिं कशाचें ' ]

भूषण तुजसि कशाचें ? । तुझिया लांछन थोर यशाचें !
हें तंव दूषण थोर यशाचें ॥ ध्रु० ॥

पथकाचा तूं नायक ह्मणुनि । स्वैर न वागायाचें ।
कर्तव्य तुझें सान मुलांना । दिशा दाखवायाचें ।
न तरी लांछन थोर यशाचें ? ॥१॥

चहा, दारू व्यसनें परदेशी ! कार्य बहिष्काराचें ।
करुनि निष्ठा, धृति, विक्रम, बल । कशास गाजायाचें ।
व्हाया लांछन थोर यशाचें ? ॥२॥

लाठीचे आघात सोसुनी । गोळी जिरवायाचें ।
धैर्य दाखवायचें कशाला । ध्वज रक्षायाचें ।
व्हाया लांछन थोर यशाचें ? ॥३॥

तलवारीचे धारेवरती । कशास नाचायाचें ? ।
व्रत देशीचें स्वीकारावें । स्वातंत्र्यप्राप्तिचें ।
व्हाया लांछन थोर यशाचें ? ॥४॥

खादी टोपी खादी सदरा । धोतर हे खादीचें ।
नेसुनि झुरके सिगारेटचे । बाजुस सोडायाचे ।
नव्हें कां लांछन थोर यशाचें ? ॥५॥

पावित्र्याची मूर्ति महात्मा । वस्त्रहि पवित्रतेचें ।
खादीचें वापरुनी, त्यांना । कां अवमानायाचें ? ॥
व्हाया लांछन थोर यशाचें ? ॥६॥

हळूंच हॉटेलांत जाउनि । घुटके चार चहाचें ।
घेवुनि इकडे स्वदेशभक्तहि । तसेंच मिरवायाचें ।
हें तर लांछन थोर यशाचें ॥७॥

हिंद देविला हवेंत सेवक । पूर्ण एकनिष्ठेचे ।
नांवास अशानेंच आपुल्या । लांछन लागायाचें ।
हें का भूषण थोर यशाचें ॥ ८ ॥


§ तप आचरुनि घोर तर महा । प्रसन्नहि करायाचें ।
देवाजी वर द्याया येतां । जागेंहि नसायाचें ।
हे कां भूषण थोर तपाचें ? ॥ ९ ॥

व्रत स्वदेशी स्वीकारूनी । हालहि सोसायाचें ।
प्राणाचीही कदर नसावी । परि दुर्व्यसन चहाचें ।
हें कां भूषण थोर यशाचें ? ॥ १० ॥

भरतें आलें, पूर लोटिले । नयनीं थोर अश्रूंचें ।
हृदय उघडिलें, पाय भिजविलें । पश्चात्तापाचें ।
सांत्वन असेंच व्हायाचें ॥ ११ ॥

---

§ कुंभकर्णाची कथा वाचकांना स्मरत असेलच.



# बालसत्याग्रही

" मालुं नका ओ, तुमी मला ॥ ध्रु० ॥

दादा शत्त्याग्लहाश गेला ।
कुथल्या तलि तो गांवाला ।
थावुक नाई तें माला ।
ह्मनून गेलो ह्मभात फेलित लात्लिय गार्नी गायाला ।
मालुं नका ओ तुमी मला ॥ १ ॥

'झेंदा उंता लहे हमाला'।
'गांधीजीला लवकल शोला'।
लोज लोज मी कित्ती मुलाला ।
ह्मन्ताना मी पाहुनी गेलों । तशलिच गार्नी गायाला ॥
मालुं नका ओ तुमी मला ॥ २ ॥

' खोतें जो बोलिल त्याला ।
जो चोली कुनि कलि त्याला '
आइ ह्मनाली ती माला
'पकलुन नेतलि, मालच देतलि । छिपाइ ते बेदम त्याला'।
मालूं नका ओ तुमी मला ॥ ३ ॥

चोली मी केली नाई ।
खोतें मी बोलत नाई ।
त्लास आईला मी काई ।
दिलाच नाई कां तुम्मी मग । पकलुनि माला ओ आनिला ?
मालुं नका ओ तुमी मला ॥ ४ ॥

गोंदूला कां पकलित नाई ।
लामूला कां पकलित नाई ।
ह्मभात फेलित होते तेही ।

मेजवानी

मला गनूला तेवलेच कां। धलून आनिले ओ, बोला ? ॥

माल्रु नका ओ तुमी मला ॥ ५ ॥

गानी झेंद्याची आमि गातां।

लस्त्यांतूनी येतां जातां।

बाजूबाजूनी आमि जातां।

काय जातसें तुमतें शांगा। धलुन मालतां कां बोला ? ॥

मालु नका ओ तुमी मला ॥ ६ ॥

आईला मी शांगिन शगलें।

उगीच आम्माला ग, धलिलें।

कुन्नाच्या ही वाते गेले।

कुन्नी नाई अन् त्यानी बग। धलून नेलें आम्माला ॥

मालुं नका ओ तुमी मला ॥ ७ ॥

आई शांगिल देवाला।

देवाल्यांतिल शगल्याला।

उगिच मालिल पोलाला।

मग देवच येउन मालिल तुम्मा। हातीं घेउन काथीला ॥

मालुं नका ओ तुमी मला ॥ ८ ॥

आमी कुनाला बोलत नाई।

आमी कुनाला मालत नाई।

बोलता आमा येतच नाई।

मालता आमा येतच नाई।

ह्मनून ऐका तुमीहि आमुर्ता। कालजी अशे देवाला ॥

मालुं नका हो तुमी मला" ॥९॥


# भिक्षा

[ चालः–' सखया श्रीरामा ' ]

द्या आह्मा भिक्षा । ही शिक्षा ।
स्वातंत्र्याची दीक्षा । आह्मीं स्वीकरली ॥ १ ॥
पिक शेतावरती । येई किती ।
आणुनि त्यांनीं जप्ती । धान्य जमा केलें ॥ २ ॥
लागुं नये हातीं । श्रमें किती ।
धान्यें पिकविलिं असती । ती अधिकाऱ्यांच्या ॥ ३ ॥
गंजी गवताच्या । धान्याच्या ।
राशी करें स्वतांच्या । ह्मणुनी जाळियल्या ॥ ४ ॥
कोणा उपहसिलें । समजविलें ।
बोल हिताचे (?) गमले । अधिकाऱ्यांना जे ॥ ५ ॥
सारा वाढविला । हा कसला ।
गरिबाच्या मानेला । फांस असा बसला ॥ ६ ॥
कितिकांना धरिलें । ते नेले ।
कारागृहिं घातियलें । मन वळवायाला ॥ ७ ॥
परि विनती आमुची । सर्वांची ।
एकचि निर्वाणीची । ती त्यांना कथिली ॥ ८ ॥
विकुनी घरदारा । तो सारा ।
देऊं आमुचा प्यारा । सांगेल महात्मा ॥ ९ ॥
कितिकांना छळिलें । कटु वदले ।
बोल हृदयिं ते रुतलें । कारागृहवासीं ॥ १० ॥
परि न कुणी वळले । तें सहिलें ।
कष्ट न त्यांनीं गणिलें । कष्टप्रद मुळिंही ॥ ११ ॥
उरले सुरलेले । ते गेले ।
घरदारा सोडियले । परदेशी झाले ॥ १२ ॥

## मेजवानी

छप्पर गवताचें । हे साचें ।
वरती प्रासादाचें । स्वतंत्रता जेथें ॥१३॥
थंडी वाऱ्यानें । डौलानें ।
डुलते अभिमानानें । जळते न उन्हानें ॥१४॥
प्रेमाचें फूल । ही झूल ।
हृदयाची, मृदु बोल । तळमळ निववील ॥१५॥
दारिं असे येणें । दीनपणें ।
कांहीं न पडेल उणें । आपुल्या प्रेमानें ॥१६॥
करुं तुमची सेवा । सद्भावा ।
धरुनि मनीं; हा मेवा । आपुल्या भिक्षेचा ॥१७॥



## लालाजी–
## पंजाबचा लाल–

[चालः–'भला जन्म हा तुला']

( बहिष्काराच्या चळवळीस ज्यांनीं स्वतःचा देह समर्पण केला, त्यांचें स्मृतिगीत येथें देणें, अस्थानीं कसें होईल ? )

' ढेकुणाच्या संगें हिरा जो भंगला ।
कुसंगें नाडला साधू तैसा ' ॥

( १ )

हिंदभूमिच्या कनकरत्नमय अफाट खाणींतून ।
कितिक नररत्नें आलीं वर ॥
**लाल, बाल, पाल** हीं माणिकें परवशता घनतमीं ।
चमकलीं सतेज तीं सुंदर ॥
स्वतंत्रतेच्या रत्नजडित त्या सुंदर मुगुटांतून ।
रत्नें पडलीं किति निखळुन ॥
राज्यकारभारहि सुवर्ण कारागिरी ।
विपरीत परिस्थिति ठेवुनि ऐरणिवरी ।
कारावास, मायभूमिवास—बंधनघरी ।
हिरा न भंगे जरी मारुनि मारुनि घण वरती ।
जेरीस अखेर ते येती ॥


२

ते बाल, **दास**, ते **मुनशिरामजी** निजधामा नेले ।
स्वतेजे हार नाहिं गेले ॥
पंजाबाचे लाला आजहि मृत्युवश झाले ।
छे ! छे खुनास बळि पडले ॥
कुसंगतीनें साधु नाडला ढेकुणसंगें हिरा
भंगला आज लाल हा खरा ! ॥

पोलीस- दंडुका छातीला लागला ।
परि डरला नाहीं वर करण्या छातिला ।
निःशस्त्र निरपराध्यावर कर टाकिला ।
भ्याडपणानें मारा करणें वीराच्या नीतिला ।
लांछन ! काय होय त्याजला ? ॥

३

लालाजींचा खून जाहला मृत्यु हा कसला ? ।
लांबचा सान्निध पाठविला !॥
लालाजींच्या मृत्युमुळें त्या भुजस्फुरित झाला ।
हिंदुच्या ' सूड ' मनीं आला ॥
स्मारक त्यांचें खरेंच करणें असेल आपणांला ।
लक्ष द्या एकच गोष्टीला ॥
स्वातंत्र्य देविचा ' जय, जय ' बोला चला
पदकमलांपुढती करा हाच पण भला ।
साधितां ध्येय स्वातंत्र्य राष्ट्रभूमिला ।
भला बुरा जरि प्रसंग आला जवळ करा मृत्युला ।
सार्थ हा जन्म तरिच झाला !"॥



# हिंददेवीची निर्वाणीची विनवणी

[चालः–' चालूं नको बा धांव हरी']

धावुन येई मुरलिधरा । नाहिं तुझ्याविण मज थारा ॥ धृ० ॥

दीन लेकुरें ।
व्यसनीं पडती ।
येई पहाया ।
त्यास जरा । नाहिं तुझ्याविण मज थारा ॥ १ ॥

होइ कां ? गुन्हा माझ्या ।
भक्तिचा असा हा ? ।
पाहवेन हा ।
छल सारा । नाहिं तुझ्याविण मज थारा ॥ २ ॥

कष्ट छलाविण ।
थोर पदाला ।
मार्ग नसे ।
त्यांना दुसरा । नाहिं तुझ्याविण मज थारा ॥ ३ ॥

स्वस्थिति–कथना ।
मुख न खुलें हीं ।
कोंडमारा ।
हा न बरा । नाहिं तुझ्याविण मज थारा ॥ ४ ॥

पतितोद्धारा, ।
दुःखपीडितां, ।
आज मुलांना ।
दे थारा । नाहिं तुझ्याविण मज थारा ॥ ५ ॥

# सत्याग्रही संक्रान्त

[चालः–'तुझ्या बाल मुकुंदें']

तिळगूळ कशाचा जन, देणें हो तुह्मां ? ।
संक्रान्त अशी ही लिहिणें आलें आह्मां ॥
किति बंधू भगिनी कारागृहिं कष्टती ।
किति देह स्वतांचा मायभूस अर्पिती ॥
कितिकांनीं आपुलें रुधिर पहा सिंचिलें ।
रुग्णालयिं जखमी कितिक पहा राहिले ॥
दुःखांत सुखहि तें एकच लिहिणें असे ।
स्वातंत्र्य-संगरीं विजय आह्मां येतसे ॥
सत्शील बलाची राष्ट्रिय निष्ठेचि ही ।
लागली कसोटी हिणकस ते अल्पही ॥
सुख दुःख युक्त हा तिळगूळ घ्या स्वीकरा ।
घ्या गोड करून मग मार्ग सुधारुं बरा ॥
परमेश्वर—चरणीं मागुं एक मागणीं ।
यश सिद्धी आमुच्या यत्ना येवो झणीं ॥





ग्रं. क्र. ४२३२

हिंदमातेचा विलाप



जन्म २०।४।१८६१ } कै० पं० मोतिलाल नेहरू { मृत्यु ६।२।१९३१

'वैभव राजासमान। गुण, गौरव, कीर्ति, मान।'

8232

किंमत **श्रीदत्तमहात्म्य** कमी केली

श्री भगवान् वासुदेवानंद सरस्वति ( टेंब्ये ) स्वामीकृत

प्राकृत ओवीबद्ध श्रीदत्तमहात्म्य ग्रंथ मोठ्या टाईपांत छापलेला विक्रीस तयार. त्वरीत मागणीकरा. किं रु. २॥. फक्त.

**श्रीवासुदेव दत्तगीत**

किं. ४ आणे. ट. ख निराळा

श्रीदत्तदास

**नरसिंह नारायण उकिडवे**

श्रीवासुदेव दत्तमंदिर ( खामकील वाडा ) सावंतवाडी

---

# मराठी लघु लिपि

## ह्मणजेच

# मराठी शॉर्ट हँड शिका.

चौकशी करा

पत्ताः— विनायक दत्तात्रय नाफड,

शॉर्ट हँड अँड टाईप राइटिंग क्लास,

दिवाणांची माडी, सातारा.

# दी नागपूर पायोनियर इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड.

हेड ऑफीस—नागपूर शहर.

## उत्तम व्यवस्था!

## अलौकिक फायदे?

निव्वळ राष्ट्रीय तत्वांवर काम करणारी हीच एक कंपनी आहे

## आपले आयुष्याचा विमा याच कंपनींत उतरा.

पूर्ण माहितीकरितां खाली सही करणाराकडे चौकशी करा.

आ. वि. नावर,
सेक्रेटरी.

# विविध तरंगमालेचें दुसरें सुंदर पुस्तक

केसरी, महाराष्ट्र इत्यादि पंचवीस वृत्तपत्रानें व रत्नाकर, कायस्थमित्र, भारतसेवक, कुंजविहारी इत्यादि मासिकांनीं व विनोदसम्राट गु. श्री. कृ. कोल्हटकर श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधी बी. ए. यानी प्रशंसलेले विनोदी पुस्तक

**आवृत्ती दुसरी ! पृष्ठें सांठ ! ! अँटीक पेपर ! ! ! सचित्र**

लेखकः—**प्रभाकर गणेश गुप्ते** ( संपादक वि. तं. माला. )

# संमेलन

**श्री. त्र्यं. रा. अभंग** विरचित

**मेजवानीः**— राष्ट्रीय गितांचा संग्रह आधुनिक चालीवर सर्वांगसुंदर काव्यें. सचित्र. ही सुंदर दोन पुस्तकें विविधतरंगमालेचे वर्गणीदार होणारास **पाऊणपट किंमतीस** ट. ख. नि. वा. व. फक्त १॥ रु. आतांच नांवे नोंदवा !

— **विविध तरंगमाला** — सातारा

किंमत चार आणे **सहकारी पतपेढी** तिकीट रूपानें ८५

सोसायट्या, शिक्षक, मुलें आदीकरून सर्वांना खास मार्गदर्शक होणारें पुस्तक घेऊन माहिती मिळवा ! बुकसेलरांना भरपूर कमीशन!

मार्चमध्यें निघेल ]**प्रश्नोतर शेतकीशास्त्र**[ नांवें नोंदवा

शेतकऱ्यांना, शेतकी शाळांतील विद्यार्थ्यांना व शेतकीची माहिती मिळवूं इच्छिणारांना खास मार्गदर्शक होणारें पुस्तक! छापण्यास सुरवात झाली ! जाहिराती देणारांनीं त्वरा करावी ! हें खेडोपाडीं जाणारें पुस्तक आहे ! बुकसेलरांनाहीं भरपूर कमीशन ! अगोदर लिहा ! किं. सहा आणे.

**श्रीदत्ताश्रम पेठ** ( इस्लापूर ) जि. सातारा.

---

# माहुलकर यांचे नवीन दुकान पाटखळ

आमचे दुकानीं सर्व तऱ्हेचा स्टेशनरी किराणा व भुसार सातारच्या भावानें विकत मिळेल गरजूंनीं फायदा घ्यावा.

**प्रोप्रायटर:-- आर. व्ही. प्रभुणे.**

माहुलकर यांचे किराणा, स्टेशनरी वगैरे मालाचे दुकान पाटखळ.

# ह्यालाच ह्मणतात स्वदेशी.

कारण हें शुद्ध व ताज्या वनस्पतीपासून कोणत्याही
यंत्राच्या मदतीशिवाय व आपल्याच तज्ज्ञांच्या खास
देखरेखीखालीं तयार केलेलें जगप्रसिद्ध असें
हे स्वदेशी औषध कीं, ज्याचें नांव

## मदनमंजरी गोळ्या.

या गोळयांच्या सेवनानें शौच्यांस साफ होतें, वीर्यविकारापासून होणार प्रत्येक रोग नाहासे होतात व हातपाय ठणकणें वगैरे अशक्ततेपासून होणाऱ्या सर्व व्याधि नाहींशा होऊन शरीर बळकट होतें. किंमत ४० गोळयांच्या डबीस १ रुपया.

**दमा, श्वास, व खोकल्यासाठीं अमूल्य औषधी,**

## श्वासकासारी अवलेह.

दमा, श्वास, खोकला, छातींत दुखणें वगैरे विकार या अवलेहाच्या सेवनानें लवकरच दूर होऊन शरीर निरोगी होतें. किंमत १० तोळयांच्या डब्यास १॥ रुपया.

## गर्भामृत चूर्ण.

धुपणी, अनियमित ऋतुस्राव व विटाळ वगैरे स्त्रियांचे सर्व रोग तावडतोब दूर होतात. किं डब्यास रु. २ दोन.

**राजवैद्य नारायणजी केशवजी.**

३९३ काळबादेवी रोड, भाटिया महाजन वाडीसमोर, मुंबई २.

सातारा एजन्ट — **वा. नि. आगटे**, भवानी पेठ.

स्वदेशी साखरेचे

# पेढे व बर्फी

व इतर सर्व खाण्यालायक

## मेवामिठाई

मिळण्याचे एकच ठिकाण

**रा. बी. एम. लाटकर यांचें दुकान**

सदाशिव पेठ सातारा.

---

विद्यार्थ्यांना भूगोलाचें संपूर्ण ज्ञान करून देणारीं

श्रीयुत केळकरकृत ] **सचित्र भूवर्णनें** [ विक्रिस तयार

तालुके कऱ्हाड, जावली, सातारा, तासगांव, व कोरेगांव

किंमत टपाल हंशिलासह प्रत्येकीं ३॥ आणे.

---

सातारा जिल्ह्याचा

६ वें पुस्तक ) **चित्रमय भूगोल** ( इ. ३ री करितां

लवकरच प्रसिद्ध होणार.

पत्ता:—— कृ. रा. केळकर, मु. पो. भिलवडी (सातारा)

# मेजवानी

मिळण्याची ठिकाणें — सातारा

१ मॅनेजर ऐक्य ऑफीस,

२ डिंगणकर जनरल स्टोअर्स

३ श्रीराम स्टोअर्स

४ रा. निघोजकर, लक्ष्मी स्टोअर्स

५ मॅनेजर विविध तरंगमाला

६ त्र्यं. रा. अभंग, ६४, शनवार

## श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर

### लिहितातः—

“महाराष्ट्रांत अनेक पक्षभेद निर्माण झाले असतांना अपरांतील ही दुही शक्य तों कमी होऊन पक्षापक्षांत सख्य घडून येऊन देशाच्या एकीकरणासाठीं सर्वजण एक व्हावें या हेतूनें

## ऐक्य

### पत्राच्या मुखानें

जी चळवळ चालू आहे ती निःसंशय वाखाणण्यासारखी आहे.”

वाचकहो, आपल्याला ‘ ऐक्य ’ पाहिजे ना? मग आजच लिहा. नमुना फुकट ! **वा० व० ट० ह० सह फक्त २ रु० १२ आणे.**

व्यापाऱ्यांनों, तुमची जाहिरात ‘ **ऐक्यां** ’त द्या !

**व्यवस्थापक—ऐक्य, सातारा.**

REFBK 0004232

REFBK-0004232